# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

निष्काम जन सेवार्थ समर्पिता

**दिनांक १९.१२.२००५ रोजी सपन्न झालल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त .**

सोमवार दिनांक १९ डिसेंबर २००५ रोजी मा.महापौर श्री. किशनचंद लेखराज तणवानी यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा महानगरपालिकेच्या मुख्यकार्यालयातील ''प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे '' सभागृह येथे दुपारी १२.१५ वाजता ''वंदेमातरम्''या गिताने सुरू झाली सभेला मा.आयुक्त यांचेसह संबधीत अधिकारी तसेच खालील प्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

०१. स.स.श्री.भगवान घडमोडे
०२. स.स.श्री.काशिनाथ कोकाटे
०३. स.स.श्री.संजय शिरसाट
०४. स.स.श्री.तरविंदरसिंग धिल्लन
०५. स.स.श्री.बम्हणे पुनमचंद सोनाजी
०६. स.स.श्री.सुरे सिताराम इसराम
०७. स.स.श्री.ताठे भाऊसाहेब पुंडलिक
०८. स.स.श्री.पांडे विनायक प्रभाकर
०९. स.स.श्री.दाभाडे मिलींद यशवंत
१०. स.स.श्री.ठाकुर पुरूषोत्तम रघुविरसिंग
११. स.स.श्री.खान सलिम खान यासीन
१२. स.स.श्रीमती पाटील अलका रमेश
१३. स.स.श्री.जगताप संजय उत्तमराव
१४. स.स.सौ.मसरद बेगम शरफोद्दीन
१५. स.स.श्री.गायकवाड दिलीप नारायण
१६. स.स.श्री.मेघावाले मोहन धन्नुलाल
१७. स.स.सौ.रजनी रमेश जोशी
१८. स.स.श्री.माळवतकर महेश शिवाजीराव
१९. स.स.श्री.अत्तरदे प्रकाश सुका
२०. स.स.श्री.जैस्वाल अनिल जुगललाल
२१. स.स.श्री.सोनवणे कचरू श्रीपती
२२. स.स.सौ.इंगळे शंकुतला सांडुजी
२३. स.स.श्रीमती शिंदे मिराबाई रामराव
२४. स.स.सौ.पाटील दिपाली सुनिल
२५. स.स.सौ.खान अजरा जबीन मसुद
२६. स.स.सौ.खान मेहेरून्नीसा खान हमीद
२७. स.स.श्री.मो.जावेद मो.इसाक
२८. स.स.सौ.मिटकर शोभा हरीश्चंद्र
२९. स.स.सौ.यास्मिन बेगम अ.कदिर
३०. स.स.श्री.खान जावेद हसन कासीम हसन
३१. स.स.श्री.स.खुसरो बुऱ्हानोद्यीन
३२. स.स.श्री.अ.रशिद खान मामु

३३. स.स.सौ.लता श्रीनिवास दलाल
३४. स.स.श्री.पाटील नरवडे वसंत पांडुरंग
३५. स.स.श्री.रिडलॉन संजु सुग्रीव
३६. स.स.श्री.खान कैसर बद्रोद्दीन
३७. स.स.सौ.कुरैशी नजमा बेगम युनूस
३८. स.स.श्री.खान निसार मो.खान
३९. स.स.श्री.हाजी शेरखान अ.रहेमान
४०. स.स.श्री.बैनाडे कंवरसिंग किसनसिंग
४१. स.स.श्री.देसरडा प्रशांत सुभाष
४२. स.स.श्री.अमोदी अबुबकर बिन सईद
४३. स.स.सौ.शेख शमशाद बेगम शेख हफीज
४४. स.स.श्री.जेजुरकर संतोष सुधाकरराव
४५. स.स.श्री.पटेल सलिम समशेर पटेल
४६. स.स.श्री.तुपे त्र्यबंक गणपतराव
४७. स.स.सौ.पोळ सरला सखाराम
४८. स.स.श्री.कटकटे सतीष विश्वनाथ
४९. स.स.सौ.खान जहुरबी नासेर
५०. स.स.सौ.बोरामणीकर कला सुरेश
५१. स.स.श्री.कराड भागवत किसनराव
५२. स.स.सौ.मंगला प्रकाश गायकवाड
५३. स.स.श्री.वैद्य रेणुकादास दत्तोपंत
५४. स.स.श्री.सावंत मधुकर दामोधर
५५. स.स.श्री.गांगे रविंद्र लक्ष्मण
५६. स.स.सौ.पाटणी हर्षमाला विजयकुमार
५७. स.स.श्रीमती डॉ.बिनवडे आशा उत्तम
५८. स.स.श्री.खुडे विजय किसन
५९. स.स.श्री.खेंडके संतोष सर्जेराव
६०. स.स.श्रीमती किवळेकर जयश्री सारंग
६१. स.स.श्री.शिंदे दामोधर माधवराव
६२. स.स.श्री.गांगवे बन्सीलाल तुळशीराम
६३. स.स.सौ.ससाणे सरीता अशोक
६४. स.स.श्री.वाघ भाऊसाहेब बाबुराव
६५. स.स.श्री.डांगे बाबासाहेब लक्ष्मण
६६. स.स.श्री.कुचे नारायण तिलोकचंद
६७. स.स.सौ.शिंदे पुष्पा बाळु
६८. स.स.श्रीमती वाघमारे पार्वताबाई विजय
६९. स.स.सौ.संगिता विठ्ठलराव जाधव
७०. स.स.श्री.विसपुते शंशाक दामोधर
७१. स.स.श्री.निमगांवकर प्रल्हाद गणपतराव
७२. स.स.सौ.खंदारे वंदना प्रकाश
७३. स.स.सौ.कोंडेकर अंजली दिलीप
७४. स.स.श्री.जोशी संजय रामदास

७५. स.स.सौ.विजया किशोर रहाटकर
७६. स.स.श्री.दाभाडे हिम्मतराव साळुबा
७७. स.स.श्री.ओबेरॉय मनमोहनसिंग करमसिंग
७८. स.स.श्री.मोरे कचरू विश्वनाथ
७९. स.स.श्री.बारवाल गजानन
८०. स.स.सौ.मोमीन सफीया फिरदोस
८१. स.स.सौ.घोडेले अनिता नंदकुमार

**नामनिर्देशित पालिका सदस्य**

०१. स.स.श्री.केनेकर संजय किसनराव
०२. स.स.श्री.राजेश व्यास
०३. स.स.श्री.सुरेंद्रसिंग सबरवाल

**चर्चा :**

श्री.अ.रशिद खान :लोकसभेचे सदस्य व माजी केंदीयमंत्री पै.श्री.पी.एम.सईद यांचे नुकतेच दु:खद निधन झालेले आहे त्यांना सभागृहातफे दोन मिनिटे श्रध्दाजंली अर्पण करावी.

सौ. रजनी जोशी :जेष्ठ अभिनेते व नाटककार स्व . श्री. सुधीर जोशी यांचेही दु:खद निधन झालेले आहे त्यांना श्रध्दाजंली अर्पण करण्यात यावी.

श्री. देसरडा प्रशांत
श्री.काशिनाथ कोकाटे : यास माझे अनुमोदन आहे.

मा. महापौर : ठिक आहे सर्वांनी श्रध्दाजंलीसाठी उभे रहावे.

याचवेळी माजी केंद्रीयमंत्री पी.एम.सईद, जेष्ठ अभिनेते व नाटककार स्व.श्री.सुधीर जोशी यांचे दु:खद निधनाबध्दल सभागृहात दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दाजंली अर्पण करण्यात आली.

श्री.संजय जोशी :अकोला महानगरपालिकेचे मुख्यलेखाधिकारी श्री.संजय राठी यांनी आत्महत्या केली. एका वरीष्ठ अधिकाऱ्याकडून बिल काढण्यासाठी अधिकाऱ्याला दबाव येतो व त्यांना आत्महत्या करावी लागते ही अतिशय निंदनीय बाब आहे. अशी घटना या महानगरपालिकेत भविष्यात घडू नये यासाठी मा.महापौर यांनी उच्च अधिकाऱ्याकडून अशा प्रकारचा दबाव येणार नाही. याची काळजी घ्यावी.

मा.महापौर : इतर महानगरपालिकेचा येथे संबध येत नाही. सभागृहाचा तो विषय नाही. आतापर्यत कोणत्याही अधिकाऱ्यानी माझ्याकडे तक्रार केलेली नाही. या विषयावर चर्चा न करणे योग्य होईल.

श्री.अ.रशिद खान : संबधीत लेखाधिकारी हे कमजोर असतील म्हणून आत्महत्या केली परंतू या महापालिकेचे मुख्यलेखाधिकारी हे मजबूत आहे.

मा.महापौर : विकास कामाच्या संदर्भात चर्चा करावी.

श्री.अ.रशिद खान :मालमत्ता कर तसेच पाणी पट्टीची वसूली होत आहे. तसेच बीओटी पध्दतीने काही कामे दिली जात आहे. चांगली बाब आहे परंतू जकात नाक्यावर मोठया प्रमाणात चोरी होत आहे त्या बाबतीत काय कार्यवाही करणारआहेत.पैठण नाका येथून दिनांक ६.१२.२००५ रोजी एमएच १३ आर-१६७८ क्रमांकाच्या गाडीत सिमेंट आले होते.तीन दिवस गाडी नाक्यावर उभी होती. संबधीतास १६२० रूपयाची पावती दिली व ऑफिस रेकॉर्डवर १० रूपये जमा झालेले आहे. तसेच अनेक गाड्यामधून फर्नीचर येत आहे इलेक्ट्रिकल साहित्य येत आहे. छावणीमधे उतरविले जाते. व सकाळी जकात निरीक्षक हे गाडी मालकाकडून पैसे जमा करीत आहे. सदर पावतीची चौकशी का थांबून ठेवलेली आहे. कळायला मार्ग नाही

प्रशासनास या बाबतीत सर्व माहिती आहे. खुलासा घेण्यात यावा.श्री.वाकेकर जकात निरीक्षक यांचे हप्ते बांधलेले आहे.

मा.महापौर : या संबधीची चौकशी चालू आहे किंवा काय चालू असेल तर काय निष्पन्न झालेले आहे उपआयुक्त महसूल यांनी खुलासा करावा.

उपआयुक्त ,महसूल :स.सदस्य श्री. अ.रशीद खान यांनी जो मूद्या उपस्थित केलेला आहे तो सत्य असून गाडी क्र एमएच १३ आर १६७८हे जेंव्हा तपासले तेंव्हा दोन्ही पावत्यामधे तफावत आढळून आलेली होती. ही पावती देणारे कर्मचारी श्री.राहूल पल्लेवार यांना दिनांक ८.१२.२००५ रोजी प्रशासनाने निलंबीत केलेले आहे. तसेच कर्तव्यात कसूर केल्याबध्दल जकात निरीक्षक श्री. वाकेकर यांची जकात विभागातून बदली करण्यात आलेली आहे.

श्री. अ.रशिद खान : जकात निरिक्षक ५००, इतरांना २००/- खोटे रेकॉर्ड जमा व्हावे. नाशिकला टॅव्हल खरेदी केलेले आहे. व्यापाऱ्यांना वेगळे व खालच्या पावतीवर वेगळे असे अनेक वेळा होत आहे.कर्मचाऱ्याच्या चुकीमूळे जकात कमी येत आहे. चोरी होत असतांना पोलीसात गुन्हा नोंदविला जात नाही. नुसती बदली किंवा निलंबीत करून चालणार नाही. कार्यवाही झाली पाहिजे. मोठया प्रमाणात चोरी होत आहे. जे कर्मचारी नागरीकांचा पैसा चोरून स्वत: चा फायदा करून घेत आले त्या बाबतीत चौकशी का होत नाही. निलंबीत करून चौकशी थांबविणे योग्य नाही निलंबीत केल्यानंतर पून्हा सहा महिन्यात कामावर घ्यावे लागते. संबधीतावर पोलीस केस का केलेली नाही.

श्री.संजय जोशी : जेंव्हा जकात चोरी होते चोरीचा संबधीतावर पोलीसात गुन्हा नोंदवावा असे प्रशासनास वाटले नाही का. स.सदस्य सभागृहात कायम सांगतात जकातीत चोरी होते परंतू प्रशासन त्याकडे दुर्लक्ष करते योग्य माहिती देत नाही. गेल्या ७ तारखेला मी पत्र देवून माहिती विचारली की शहरात सिमेंन्ट व बांधकामासाठी लागणारे स्टिल किती आलेले आहे. आजपर्यत उत्तर मिळालेले नाही. शहरात येणारे सिमेंट स्टील व दिलेल्या बांधकामास परवानगी यासाठी लागणारे मटेरियल याचा विचार केल्यास ५० ते ६० टक्केचा फरक येतो. गांभीर्याने घ्यावे.

श्री.संजय जगताप : लिपीक यांना निलंबीत करण्या अगोदर जकात निरीक्षक यांना निलंबीत करावे व जो दोषी आहे, त्यांना निलंबीत करावे.

श्री.संजय सिरसाट :जकात मधे चोरी होते हे नवीन सांगण्याची गरज नाही. जकात चोरी करण्याचे प्रकार वेगवेगळे आहे. एखादी गाडी मशीन घेवून नाक्यापर्यत आल्यानंतर जर लिपीक यांना वाटले ही मशीन ५ लक्ष ऐवजी ती ७ लक्षची आहे म्हणून गाडी अडवून ठेवली जाते व ती गाडी सेन्ट्रल नाक्यावर पाठवली जाते तेथे मोठया प्रमाणात भ्रष्टाचार होतो. उपआयुक्त महसूल यांनी थोंडक्यात उत्तर देवून टाकले आम्ही त्यातले कोणी नाहीच असे दाखवून दिले. या संबधीची कार्यवाही उपआयुक्तपासून ते खालच्या कर्मचाऱ्यापर्यत झाली पाहिजे.जेव्हा चोरी होते ती पकडली जाते व त्या कर्मचाऱ्यावर कार्यवाही होते याची माहिती या महापालिकेचे प्रमुख म्हणून मा.महापौर उपमहापौर व इतर पदाधिकाऱ्याकडे दिलेली आहे का?दिलेली नसेल तर का दिलेली नाही याचा खूलासा करण्यात यावा.

मा.महापौर :या संबधीची माहिती माझ्याकडे आलेली नाही.इतर पदाधिकारी यांचेकडेही दिलेली नाही असे मला वाटते. माहिती देणे आवश्यक होते किंवा नाही. याचा खुलासा करण्यात यावा.

उपआयुक्त,महसूल : संबधीत लिपीक श्री.पल्लेवार यांची निलंबणाची कार्यवाही व श्री. वाकेकर यांची केलेली बदली ही संपूर्णत: प्रशासकीय बाब आहे. या संबधीचे आदेश मा.आयुक्त यांचे मान्यतेने निर्गमित झालेले आहे. या प्रकरणी पदाधिकाऱ्यांना कळविलेले नाही.

श्री.संजय सिरसाट :जो खुलासा केलेला आहे तो चूकीचा आहे. पदाधिकारी यांना माहिती न देणे हा सभागृहाचा अपमान आहे.अशा पध्दतीने प्रशासन चालत असेल तर संबधीत उपआयुक्त महसूल यांना त्याचे विभागामधे परत पाठवावे ऐनवेळचा मी ठराव ठेवतो निर्णय घ्यावा. प्रशासकीय कारणास्तव काही कर्मचाऱ्याच्या बदल्या केल्या जातात त्याची माहिती पदाधिकारी यांना दिली जाते जेथे चोरी होते त्याची माहिती दिली जात नाही हे बरोबर नाही.

श्री.दामोधर शिंदे : संबंधित लिपीकाची चौकशी करावी.

याच वेळी मा.महापौर डायस जवळ स.सभासद जमा होतात व मोठमोठयाने बोलतात काहीही ऐकू येत नाही.

मा.महापौर : प्रशासकीय बाब म्हणजे काय याचा पून्हा उपआयुक्त महसूल यांनी खुलासा करावा.

उपआयुक्त,महसूल : श्री.राहूल पल्लेवार यांचे निलंबणाचे आदेश मा.आयुक्तांच्या मान्यतेने उपआयुक्त (प्रशासन) यांचे कार्यालयामार्फत देण्यात आलेले आहे. गैरप्रकाराची माहिती विभागाचे प्रमुख म्हणून माझ्याकडे आलेली होती व ती उपआयुक्त प्रशासन यांचेकडे पाठविण्यात आलेली होती. संबधीतांनी प्रशासकीय शिस्तीचा भंग केलेला आहे म्हणून कार्यवाही केलेली आहे एवढाच माझा म्हणण्याचा अर्थ होता.यापूर्वी निलंबणाची कार्यवाही झालेली आहे त्या बाबतीची माहिती मा.महापौर किंवा इतर पदाधिकारी यांना देण्यात आलेली नाही. सदर या प्रकरणाची माहिती मा.आयुक्त यांचे आदेशानूसार सर्व पदाधिकारी यांना देण्यात येईल.

श्री.संजय सिरसाट :यापूर्वी ज्या कर्मचाऱ्याचे निलंबन झालेले किंवा बदल्या करण्यात आलेल्या आदेशाची प्रत पदाधिकारी म्हणून माझ्याकडे दिलेली आहे १०मिनिटांच्या आत सभागृहात सादर करतो. जर प्रत मिळाली तर उपआयुक्त यांनी चुकीची माहिती दिलेली आहे सभागृहाचा अपमान होतो आहे असे समजून त्यांना ताबडतोब त्याचे विभागात परत पाठवावे तसा ठराव मी ठेवतो तो पास करावा.

श्री.अ.रशीद खान :निलंबीत करणे ही प्रशासकीय बाब झाली परंतू संबधीतांनी चोरी केलेली आहे महानगरपालिकेचे नुकसान केलेले आहे ती माहिती पदाधिकारी यांना देणे आवश्यक होते.प्रशासकीय बाब मधे चोरी येत नाही.

मा.महापौर :स.सदस्य श्री. अ. रशीद खान मामू यांनी जे मत मांडलेले आहे त्या संबधी खुलासा करावा.

उपआयुक्त,महसूल :या पूर्वी जो खुलासा केला त्यातच मी म्हटले की संबधीत कर्मचारी यांनी गैरप्रकार केलेला असून महानगरपालिकेची फसवणूक केलेली आहे. संबधीत लिपीक यांनी आर्थिक गैरव्यवहार केलेला आहे.निलंबणानंतरची जी कार्यवाही आहे ती तात्काळ करून संबधीतावर फौजदारी गुन्हा दाखल करण्यात येईल.

श्री.अ.रशीद खान :जकात मधे चोरी झाली. त्या संबधी मा.महापौर यांना कळविलेले आहे का महानगरपालिकेचे यात नुकसान झालेले आहे.

श्री.संजय जोशी :एखादया कर्मचाऱ्यास निलंबीत केल्यानंतर त्यांची माहितीस्वत म्हणून सभागृहाला नियमानूसार कळविणे आवशक आहे अशी कायदयात तरतूद आहे. सर्वसाधारण सभेला नेमणूकीचे अधिकार आहे.

श्री.अ.रशीद खान :कोणता माल येतो व कोणत्या मालावर जकात आकारणी होते.पुराव्यानिशी दाखविलेले आहे. यांना हप्ते येतात आतापर्यंत प्रशासनाने काय कार्यवाही केलेली आहे. सदस्याकडे माहिती असते प्रशासनाकडे नसते हे योग्य नाही.

श्री.प्रशांत देसरडा :स.सदस्य श्री. अ. रशीद खान यांचेकडे जी माहिती आहे ती सर्व कागदपत्र घ्यावी व त्या संबधीची चौकशी करण्यात यावी.

डॉ. भागवत कराड :जकात चोरी संदर्भात अनेक वेळा या सभागृहात चर्चा झालेली आहे. जेव्हा चोरी होते त्याची माहिती दोन उपआयुक्त असतांना मा.महापौर यांना देणे आवश्यक आहे.ती दिलेली नाही उपआयुक्त प्रशासन यांची ती जबाबदारी होती. आतापर्यंत ज्या ज्या वेळी चोरी झाल्याचे निष्पन्न झालेले आहे किती लोकांवर गुन्हे दाखल केलेले आहे. यानंतर जकात मध्ये चोरी झाल्यास संबधीतावर गुन्हे दाखल करावे असा निर्णय या सभागृहाने घ्यावा.

श्री.त्रिबंक तुपे : दोषीवर कार्यवाही करा. जकातीचे खाजगीकरण झाल्यानंतर हा विषय राहणार नाही. आता दुसऱ्या विषयावर चर्चा करावी.

श्री.प्रशांत देसरडा :आताचउपआयुक्त महसूल यांनी खूलासा केला ८.१२.२००५ च्या नंतर आणखी काही कर्मचाऱ्याना निलंबीत केलेले आहे का याचाही खुलासा देण्यात यावा.

सौ.लता दलाल :उपआयुक्त प्रशासन यांची ही जबाबदारी होती असे असले तरी उपआयुक्त महसूल यांचेकडे जकात विभाग आहे. व या विभागात कोणी गैरव्यवहार केला असेल त्यांचेवर कार्यवाही केली असेल. याची माहिती ही विभाग प्रमूख म्हणून उपआयुक्त महसूल यांनी मा.महापौर पदाधिकारी यांना देणे आवश्यक होते.प्रशासनाचा दुसरा भाग हा पदाधिकारी आहे हे प्रशासन विसरलेले दिसते.तो अभ्यास उपआयुक्त महसूल यांनी केलेला दिसून येत नाही.इतर प्रकरणात माहिती पदाधिकारी याना दिलेली आहे या प्रकरणात दिलेली नाही उपआयुक्त महसूल यांचा त्यांना पांठिबा होता अशी शंका येत आहे. पांठिबा असेल म्हणून चौकशी करू हेही उपआयुक्त महसूलच ठरवितात. चौकशी होईल नंतर गुन्हा दाखल करण्यात येईल हे उपआयुक्त महसूलच ठरवितात.नियमानुसार माहिती देणे आवश्यक होते की नाही याचा खुलासा घेण्यात यावा.

श्री.अ.रशिद खान :यापूर्वीही सोन्यावर जी जकात घ्यायची होती त्या संबधीची चोरी झालेली होती.त्याची माहिती मा.महापौर यांना दिलेली नाही. नुसते निलंबीत करून कार्यवाही होते असे नाही. विभाग प्रमूखच चौकशी करणार हे बरोबर नाही.या सर्वांना त्या विभागातून हटवावे त्यानंतर चौकशी करावी. जे दोषी आहे ते उघडकीस येतील.तसेच यापूर्वी मध्यवर्ती जकात नाक्यावर मारहाण झालेली होती. त्याची माहितीही मा.महापौर यांना आजपर्यंत दिलेली नाही.

मा.महापौर : एक ते दीड महिण्यापूर्वी जकात नाक्यावर भांडणे झालेली होती का, खूलासा करण्यात यावा.

श्री.संजय जोशी : जर एखादया अधिकाऱ्यावर निनावी तक्रारी प्राप्त होत असतील तर गुन्हे दाखल करावेत.

मा.महापौर : जो खुलासा विचारलेला आहे तोच करावा. नाक्यावर मारहाण झालेली होती किंवा नाही.

उपआयुक्त,महसूल : अशा प्रकारची भांडणे झालेली आहे म्हणून त्या संदर्भात निनावी तक्रारी आल्या होत्या. यासंदर्भात जकात अधिक्षक श्री.वाहुळ व इतर कर्मचाऱ्यांना विचारणा केली असे काही घडले नाही.

श्री.अ.रशीद खान :याचा अर्थ संबधीत अधिकारी यांनी चौकशी केलेली नाही. जर मारहाण झालेली असेल तर कार्यवाही करण्यात यावी.अधिकारी एकमेकांना मिळालेले आहे असे दिसून येते.

श्री.कवरसिंग बैनाडे : ज्याप्रमाणे उपआयुक्त महसूल यांची जबाबदारी आहे त्याच प्रमाणे उपआयुक्त प्रशासन यांची सुध्दा तेवढीच जबाबदारी आहे. जकात चोरी होणार नाही या संदर्भात सर्व पदाधिकारी, मा.आयुक्त यांनी एकत्रित बसून योग्य तो निर्णय घ्यावा.

श्री.अ.रशिद खान : वरीष्ठापासून ते कनिष्ठापर्यत जे कर्मचारी आहे त्यांना त्याविभागातून हटवावे संपूर्ण चौकशी मा.आयुक्तांनी करावी. एक वर्षापासून चोरीचे अनेक प्रकरण होत आहे. नाक्यावर मारहाण होत आहे. चोरी होत आहे. निनावी पत्र येत असतील तर चौकशी करण्याचे उपआयुक्त यांचे काम होते ते त्यांनी केलेले नाही.काहीचे मोठया प्रमाणात हप्ते बांधलेले आहे. मोठया प्रमाणात चोरी होत आहे. याची सुध्दा चौकशी झाली पाहिजे.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय: यासर्व गोष्टी समोर यावे, प्रशासन स्वच्छ असावे.

श्री.कवरसिंग बैनाडे :पूरावे दाखवावे.आरोप करण्याचा प्रयत्न होत आहे. या महानगरपालिकेचे नाव बदनाम होवू नये.

डॉ.भागवत कराड : जकात मधे चोरी होते वांरवांर सदस्य सांगतात. आताच माजी महापौर श्री.अ.रशीद खान मामू यांनी काहींना हप्ते मिळतात म्हणून म्हटलेले आहे कोणास हप्ते मिळतात ते त्यांनी नावासहीत सांगावे.

याच वेळी मा.महापौर डायस जवळ स.सदस्य जावून मोठमोठयाने बोलतात काहीही ऐकू येत नाही.

मा.महापौर : सर्व सदस्यांनी आपआपल्याजागेवर बसावे. आताच माजी महापौर श्री.अ.रशीद खान मामू यांनी काहींना हप्ते मिळतात म्हणून म्हटलेले आहे. त्यांचेकडे पूरावे असतील तर त्यांनी मा.आयुक्त यांचेकडे दयावे. मा.आयुक्त या संबधी चौकशी करून कार्यवाही करतील.

श्री.अ.रशिद खान :स.नगरसेवकांच्या बाबतीत मी बोलत नाही. जे कुणी हप्ते घेत आहे त्याचा पूरावा माझ्याकडे आहे देवू शकतो. मुंबईहून डायरेक्ट गाडी येते त्याचेकडून गाडीचे पाचशे रूपये घेतले जाते.सिमेंन्टची ट्रक येते पावती दुसऱ्या मालाची दिली जाते. हे चौकशीमधे सिध्द झालेले आहे. नाक्यावर मारहाण होते. अशा बाबी का दडवल्या जातात.वरची पावती १६२० रूपयाची खालची पावती १० रूपयाची चौकशी मधे सिध्द होते. चोरी झालेली आहे हे मी सभागृहाच्या निदर्शणास आणून देत आहे.

श्री.गजानन बारवाल :गंभीर आरोप प्रशासनावरन केलेले आहे. मुंबईहून गाडी येते त्या गाडीमागे ५०० रूपये घेतले जाते.व दररोज हे प्रकार होतात असे स.सदस्य यांनी म्हटले आहे. जे कुणी ५०० रूपये घेत असतील त्या कर्मचाऱ्यांना आजच्या आज निलंबीत करावे.

मा.महापौर :आताच माजी महापौर अ.रशीद खान यांनी जकात मधे मोठा भ्रष्टाचार होतो म्हणून आरोप केलेले आहे. या बाबतीत मा.आयुक्त काय कार्यवाही करणार आहे तसेच पदाधिकारी यांना माहिती न देणे ही प्रशासकीय बाब आहे म्हणून माहिती दिली नाही असे उपआयुक्त यांनी म्हटले आहे चोरी होणार नाही यासाठी प्रशासन काय करणार आहे मा.आयुक्तांनी या बाबतीत सविस्तर खुलासा करावा.

मा.आयुक्त :निलंबणाचे आदेश उपआयुक्त प्रशासन यांचे मार्फत काढले जातात. यापूर्वी अशी काही पध्दत नव्हती की माहिती दिली पाहिजे. परंतू पदाधिकारी यांना माहिती देण्यास प्रशासनास काहीही अडचण नाही.

श्री.जोशी संजय :कायदयात काय तरतूद आहे. कायदा मोठा की पध्दत मोठी याचा खुलासा करावा.

मा.आयुक्त :कायदा मोठाआहे परंतू जेथे कायदा सायलन्ट असतो तेथे पध्दतीप्रमाणे जावे लागते. वरची पावती वेगळी फाडणे व खालची ही वेगळया रक्कमेची फाडणे हा चोरीचाच प्रकार आहे. या संदर्भात संबधीतावर पोलीस केस करावयास पाहिजे आताच सूचना करण्यात येत आहे. जेवढीही चोरीचे प्रकरणे निदर्शनास येतील त्यांची माहिती मा.महापौर यांना संबधीत विभाग प्रमूख यांनी दिली पाहिजे.अशी सूचना त्यांना करतो.

मा.उपमहापौर : जकात चोरी असेल किंवा सभागृहाचा अवमान असेल हा गंभीर विषय आहे. कायदयाप्रमाणे पदाधिकारी यांना माहिती देणे बंधनकारक आहे का? बंधनकारक असेल तर चूक झाली म्हणून प्रशासनाने मान्य करावे.

श्री.संजय सिरसाट :जकात चोरी संदर्भात स.सदस्यांनी सूचना मांडलेली आहे. वरच्या पावतीवर १६०० रूपये व खालच्या पावतीवर महानगरपालिकेच्या रेकॉर्डला १० रूपये. जमा झाले. ही चोरी झाली म्हणून उपआयुक्त महसूल यांनी कबूल केले व एक कर्मचारी यांना निलंबीत तर एक कर्मचारी यांची बदली केली. अत्यंत थोंडक्यात खुलासा त्यांनी केला. जी कार्यवाही केली ती माहिती पदाधिकारी यांना देणे बंधनकारक नाही ही प्रशासकीय बाब आहे, असा खुलासा केलेला आहे. कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्याचे अधिकार सर्वसाधारण सभेला आहे व त्या कर्मचाऱ्यावर जेंव्हा कार्यवाही होते तेंव्हा किमान इतर पदाधिकारी नाही तर मा.महापौर यांना माहिती देणे आवश्यक होते.कर्मचारी यांचे बदल्या झाल्या काहींनी सुट्टी घेतली तर काहींना अतिरिक्त पदभार दिला त्याची माहिती माझ्याकडे आलेली आहे.ती आपल्याकडे सादर करतो. मागे अतिक्रमणाची मोहीम चालू होती एका नागरीकांने सांगितले की कार्यालयाची संचिका माझ्याकडे आहे. परंतू कार्यालयाची संचिका गेली कशी याबाबतीत चौकशी न करता संबधीत व्यक्तीवर कार्यवाही केली. कदाचित असे ही होवू शकते की श्री.अ.रशिद खान मामू यांनी पावती दाखवली तर ही पावती आणली कोठून म्हणून त्यांचेवर ही गुन्हा दाखल होवू शकतो.ही प्रशासनाची पध्दतच उलटी चालू असून अनेक लोक गुंतलेले आहे. हप्ते चालू आहे जे आरोप केलेले आहे ते १०० टक्के बरोबर आहे. सेव्हनहिल जवळ महानगरपालिकेने अग्निशमन दलाचे वाहने धुण्यासाठी २० लक्ष खर्च करून रॅम्प बांधलेला होता. उपआयुक्तांच्या मनात आले माझ्या बंगल्याच्या बाजूला गाडया धुतल्या जातात हे चूकीचे वाटले म्हणून ते पिट तोडून टाकले व तेथे उदयान केले.शहरातील इतर अतिक्रमण तोंडणे बाजूला ठेवून अधिकाऱ्याना त्यांच्या सुविधेसाठी महानगरपालिकेचे नुकसान करणे कितपत योग्य आहे. हे जबाबदारीने बोलत आहे. या संदर्भात तीन दिवसात चौकशी करण्यात यावी व चौकशीसाठी मुख्यलेखा परीक्षक यांना नेमावे व अहवाल मागवावा. नगरसेवक हे वारंवार जे खाजगीकरण करण्याचे बोलतात ते अधिकाऱ्याच्या होणाऱ्या त्रासामूळे बोलतात. एक लिपीकाच्या घरी संगमरवर दगड बसवल्या जाते. अनेक उदाहरणे देता येतील. नगरसेवक तक्रार करतात तेंव्हा त्याची तक्रार डायरेक्ट आयुक्ताकडे जाते. एखादया कर्मचारी यांना निलंबीत करणे किंवा पोलीस केस करणे हे मा.महापौर यांना कळवायला पाहिजे होते. कारण नेमणूकीचे अधिकार हे सर्वसाधारण सभेला आहे. यामूळे सभागृहाचा अवमान झालेला आहे. हे प्रकरण गंभीर असून कार्यवाही झाली पाहिजे तसेच २० लक्ष रूपये खर्च करून जो रॅम्प तोडण्यात आलेला आहे तो का तोड्ण्यात आला व कुणाच्या आदेशानुसार व

कोणते मशीन तेथे वापरले होते. याचाही अहवाल तीन दिवसात घ्यावा. व जे दोषी असतील त्यांचेवर कार्यवाही झाली पाहिजे.

श्री.अ.रशिद खान : जकात चोरी संदर्भात गुन्हे अन्वेशन विभागामार्फत चौकशी करावी असे आयुक्तांना आदेशीत करावे.

मा.महापौर :स.सभागृहनेता यांनी जी सुचना मांडली त्याचा खुलासा शहर अभियंता यांनी करावा.

शहर अभियंता :सेव्हनहिल जवळील महानगरपालिकेने बांधलेले पीट तोडण्यात आलेले आहे. ते का तोडलेले आहे याची माहिती माझ्याकडे आता नाही.

मा.महापौर :अर्धा तासासाठी आजची सभा तहकूब करण्यात येते. या संबधीची सर्व माहिती अर्ध्या तासानंतर सभागृहा समोर ठेवावी. (सभा दुपारी १.१५ वाजता तहकूब पून्हा सभेला सुरूवात ३.०० वा.)

श्री.संजय सिरसाट :सेव्हन हिल येथील रॅम्प तोडला का व कुणाच्या आदेशानूसार तोडलेला आहे व त्यासाठी किती खर्च लागलेला होता ही सर्व माहिती घेण्यासाठी सभा तहकूब केलेली होती.

मा.महापौर :शहर अभियंता यांनी या संबधी खुलासा करावा.

शहर अभियंता :या रॅम्प साठी किती खर्च झालेला आहे व केंव्हा बांधलेला होता या संबधीची संचिका अभिलेख विभागात पाठविलेल्या आहेत. त्या सध्या उपलब्ध होवू शकल्या नाही. येत्या दोन दिवसात या संबधीचा अहवाल मा.महापौर यांना दिला जाईल.

श्रीसंजय जोशी :महानगरपालिकेची इमारत किंवा एखादी मालमत्ता पाडायची असेल तर सेक्शन ७९ नुसार स्थायी समितीची मान्यता लागते.त्यानंतरच अशी कार्यवाही करता येते.

श्री.संजय सिरसाट :जो रॅम्प २० लक्ष खर्च करून बाधंलेला होता तो एका दिवसात तोडला जातो.ती महानगरपालिकेची मालमत्ता होती. त्याची संचिका मिळत नाही. आताच शहर अभियंता यांनी खुलासा केलेला आहे. प्रशासनाची ही काम करण्याची पध्दत योग्य आहे का आयुक्तांनी खुलासा करावा.

मा.आयुक्त :कोणतीही मालमत्ता डिस्पोज्ड ऑफ करायची झाल्यास स्थायी समितीची मान्यता लागते. जर ११ महिण्यापर्यत त्याची किमंत ही ५०० रूपयापेक्षा कमी असेल तर आयुक्त करू शकतात असे माझ्या माहितीप्रमाणे नियमात आहे. ज्या मालमत्ता हया लीजवर देणे वगैरे त्यासाठी हे कलम आहे.

श्री.संजय जोशी :डीस्पोज्ड म्हणजे त्या लीजवर दिलेल्याच मालमत्ता नाही.भाडे तत्वावर दिलेल्या जागा म्हणजे डिस्पोज्ड करा म्हणून म्हणता येत नाही.

मा.आयुक्त :त्या मालमत्ता भाडेने देवू शकतो. लिजवर देवू शकतो.

श्री.संजय जोशी : सेक्शन ७९ मधे काय तरतूद आहे सभागृहाला वाचून दाखवावे.

मा.आयुक्त : नियमात काय आहे वाचून दाखविता येईल परंतू विनंती की. सदर रॅम्प केंव्हा व किती खर्च करून बांधलेला होता. कुणाच्या आदेशान्वये तोडण्यात आला. याची चौकशी तीन दिवसात शहर अभियंता करतील माझ्याकडे अहवाल देतील व त्यानंतर तो अहवाल मा.महापौर यांचेकडे देण्यात येईल.

श्री.संजय सिरसाट :महानगरपालिकेच्या मालमत्तेची संचिका मिळत नसेल तर योग्य नाही. दीड तास कशासाठी वाया घातलेला आहे.

मा.आयुक्त : सदर संचिका ही १० वर्षापूर्वीची आहे. तीन दिवसात सर्व माहिती संबधीत अधिकारी समोर ठेवतील. विधी सल्लागार यांचाही सल्ला घेतील.

याच वेळी मा.महापौर यांचे डायस समोर जावून स.सभासद एकत्र जमा होतात. संचिका आताच शोधावी म्हणून मागणी करतात.

श्री.संजय सिरसाट :या संबधीची संचिका मिळत नाही असे म्हटले. या प्रकरणात मा.आयुक्तांनी चौकशी करून अहवाल ठेवण्याचे आदेशीत करावे. तसेच उपआयुक्त महसूल यांनी जे प्रशासकीय बाब हे शब्द वापरलेले आहे. त्याबध्दल योग्य तो खुलासा घ्यावा.

मा.महापौर :रॅम्प संबधीची संपूर्ण माहिती मा.आयुक्त यांनी तीन दिवसात घेवून सभागृहात ठेवावी.तसेच उपआयुक्त महसूल यांनी जे शब्द वापरलेले आहे प्रशासकीय बाब होती म्हणून माहिती दिलेली नाही. त्या बाबतीत त्यांनी विनंती केलेली आहे की.ते खुलासा करू इच्छितात.

उपआयुक्त ,महसूल :श्री.पल्लेवार यांचे निलंबन प्रकरणी यापूर्वी मी जो खुलासा केलेला होता त्यामध्ये प्रशासनाने केलेली कार्यवाही ही प्रशासकीय आहे. याची माहिती मा.महापौर व पदाधिकारी यांना देण्यात आलेली नाही असा म्हणण्याचा माझा उद्येश होता. या मागे पदाधिकारी व नगरसेवक यांच्या भावना दुखवण्याचा माझा उद्येश नव्हता.सभागृहाच्या भावना दुखावल्या गेल्या असतील तर प्रशासनातर्फे दिलगिरी व्यक्त करतो.

श्री.अ.रशिद खान :जकात चोरी संदर्भात कार्यवाही करण्याचा निर्णय घेतलेला नाही.

मा.महापौर : आताच स.श्री.अब्दुल रशीद खान (मामू) यांनी जे जकात चोरी संदर्भात जे आरोप केलेले या संबधी मा.आयुक्त यांनी त्यांना योग्य वाटेल त्या प्रमाणे चौकशी करून अहवाल पूढील बैठकीत ठेवण्यात यावा.तसेचस.सदस्य श्री. संजय जोशी यांनी सिमेंट व स्टील च्या संदर्भात प्रश्न विचारलेला आहे त्या बाबतीत ही योग्य चौकशी करून अहवाल सभागृहात ठेवावा.या बाबतीत आयुक्तांनी चौकशी करावी.

श्री.अ.रशिद खान :शहरात ज्यांनी पार्कीगच्या जागेवर दुकाने केली त्या संबधीची अतिक्रमणे काढली जाते.चांगले काम होत आहे परंतु महापालिकेच्याच मुख्य इमारतीच्या दोन्ही ठिकाणी पार्कींगच्या जागेवर स्टोअर विना निविदा केलेले .कोणत्या निणमाप्रमाणे केलेले आहे खुलासा करावा.

मा.महापौर :शहर अभियंता यांनी खुलासा करावा.

शहर अभियंता :इमारतीतील पार्कींगसाठी जी जागा आहे तेथे स्टेअर करूनही पार्कीगसाठी जेवढी जागा लागते त्यातूनही काही जागा शिल्लक रहाते.

श्री.अ.रशिद खान :पार्कींगच्या जागेत स्टोअर करता येते का एवढाच खुलासा करावा.

श्री.संजय जोशी : असे असेल तर खाजगी व्यक्तीनी एखादया इमारतीची बांधकाम परवानगी घेतली व ३०० स्क्वे. फुट पार्कींगची जागा असेल व आवश्यकतेनूसार २०० स्क्वे.फुटच पार्कीग आवश्यक असेल तर उर्वरीत १०० स्क्वे. फुट जागेत बांधकाम परवानगी देणार का?

मा.आयुक्त :पार्कींगची जागा असेल व आवश्यकतेनूसार जेवढी जागा लागते त्या व्यतिरिक्त असलेल्या जागेत स्टोअर म्हणून वापर करता येतो. व्यवसाय म्हणून वापर करता येत नाही.

श्री.संजय जोशी :स्टोअर म्हणून वापर करता येत असेल परंतू उंची कितीअसावी या बाबतीत नियम असेल. याचा खुलासा करावा.

श्री.अ.रशिद खान : स्टोअर म्हणून प्लॅन केलेला होता का त्यास मान्यता घेतलेली आहे का? पूढील बैठकीत माहिती दयावी.

श्री.प्रशात देसरडा : जेथे स्टोअर केलेले आहे त्या विभागाचेच नाव स्टोअर आहे याचा अर्थ असा नाही की स्टोअरसाठी वापर करू शकतो. जेथे स्टोअर आहे त्यास एफएसआय दिलेला आहे का?

मा.आयुक्त : याजागेवर स्टोअर म्हणूनच वापर होणार आहे हॅबीटेबल वापर होणार नाही.

श्री.प्रशांत देसरडा :प्रत्येक विभागासाठी तेथून स्टेशनरी देणार , स्टोअर म्हणजे गोडाऊन असा अर्थ आहे.

सौ.लता दलाल :एखादया वस्तूचे स्टोअर असते तर समजू शकलो असतो. तेथे जनरल स्टोअर आहे. विभाग कार्यान्वित आहे.

मा.आयुक्त : या संदर्भात काही नगरसेवकांनी माझ्याकडे विषय मांडलेला होता की टाऊनहॉल मधील जी जूनी इमारत आहे जी की ३०० ते ३५० वर्षापूर्वीची तेथे गोडाऊन म्हणून वापर करतो ती पडण्याच्या स्थितीत आहे. त्यावर मी स्वत: पाहणी केली तेंव्हा अशा इमारतीत गोडाऊन म्हणून वापर करतो वाईट वाटले. त्यावर असे ठरले की या इमारतीला दुरूस्ती करणार व जूने जसे होते त्या प्रमाणे करणार. स्टोअर साठी जो वापर होतो आहे तो दुसरीकडे करावे म्हणून सूचना दिलेल्या होत्या त्यांनतर जागा कुठे आहे म्हणून मुद्या उपस्थित झाला तर पार्कींग ची जी जागा आहे ती वाजवीपेक्षा जास्त आहे म्हणून तेथे स्टोअर केलेले आहे. सदर जून्या इमारतीची दुरूस्तीच्या खर्चा बाबत स्थायी समिती समोर प्रस्ताव येणार आहे. स्टोअरचा वापरता कसा येईल. नॉन हॅबीटेबल वापर अनुज्ञेय आहे.दुकानाचा वापर अनुज्ञेय नाही.

श्री.अ.रशिद खान :जून्या ज्या इमारती आहे त्याची देखभाल दुरूस्ती शासन करेल त्या संबधीचे पत्र ही आलेले आहे. ती इमारत शासनाच्या ताब्यात जाणार आहे.पार्कींगमधे स्टोअर केले त्या प्रमाणे बाहेरील खाजगी व्यक्तींनाही अशी मान्यता देणार किंवा नियमात शिथिलता देणार आहात का.

श्री.नारायण कुचे :गुंठेवारी भागात देखभाल दुरूस्तीची कामे व्हावी म्हणून स्थायी समिती तसेच सर्वसाधारण सभेने निर्णय घेवून सुध्दा कामे होत नाही. काही कामाचे अंदाजपत्रक तयार आहे. मा.सभापती यांनी काही संचिका सभागृहात आणलेल्या आहेत. सभागृहाच्या आदेशाचे पालन होत नसेल तर योग्य नाही. व अशा भागात विकास कामे होणार की नाही खुलासा घ्यावा.

सौ.पुष्पा शिंदे :नवीन कामे होत असतील तर जूने जी कामे होती ती अगोदर का करण्यात येत नाही. मागिल वर्षीच्या बजेटमधे ती कामे होती.

मा.महापौर : गुंठेवारी भागात कामे करण्यासाठी बजेटमधे २ कोटीची तरतूद केलेली आहे. पाणी व ड्रेनेज,तसेच स्ट्रीट लाईटची देखभाल दुरूस्तीची कामे करावी म्हणून आदेशीत केलेले होते. आतापर्यत का ती कामे झालेली नाही मा.आयुक्तांनी खुलासा करावा.

श्री.नारायण कुचे :मा.सभापती यानी काही गुंठेवारी मधील भागात विकास कामे होण्या संदर्भात संचिका सभागृहात आणलेल्या आहे त्यास त्वरीत मा.आयुक्तांनी मंजूरी दयावी.

मा.आयुक्त :जो भाग गुंठेवारीत नियमीत होणे शक्य होईल त्या भागात पाणी , ड्रेनेज, व स्ट्रीट लाईट च्या बाबतीत देखभाल दुरूस्तीची कामे करता येतील.असे शासनाचे निर्देश आहे.नवीन कामे करता येणार नाही.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय:गुंठेवारी भागात जी कामे आहे ती कमी रक्कमेची आहेत . सेक्शन ६७(३)सी नुसार विना निवीदा काम करण्यात यावे आयुक्तांना तसे अधिकार देण्यात यावे.

याच वेळी मा.महापौर डायस समोर स.सभासद वार्डात कामे व्हावी म्हणून मागणी करतात. मोठमोठयाने बोलतात काहीही ऐकू येत नाही.

श्री.कोकाटे काशिनाथ :चालू वर्षाच्या अंर्थसंकल्पात गुंठेवारी भागात कामे होण्यासाठी दोन कोटीची तरतूद ठेवलेली आहे त्यास स्थायी समिती तसेच सर्वसाधारण सभेने मान्यता दिलेली आहे. असे असतांना देखील शासनाने जे गुंठेवारीच्या संदर्भात आदेश

काढलेले होते त्यात सुधारणा झालेली असून तो आध्यादेश लागू होत नाही. ही वस्तुस्थिती आहे परंतु दोन्ही सभागृहाने मान्यता दिल्यानंतर व मा.आयुक्त यांनीही यासभागृहात मागच्या वेळेस कामे करण्यात येतील असा खुलासा केलेला होता. बऱ्याच स.सदस्यांनी गुंठेवारी भागात कामे व्हावी म्हणून पत्र ही दिलेले आहे. परंतू अदयाप कुठेही काम केलेले नाही. स्थायी समितीत कार्य.अभियंता यांना सुचना देवून सुध्दा कामे केलेली नाही.या सभागृहात विविध गुंठेवारी भागातील विकास कामा संदर्भाच्या १९ संचिका तशाच पडून आहेत. एकही काम केलेले नाही. लेखी आदेश केल्यानंतर त्या संचिका सभापती म्हणून माझ्याकडे आलेल्या आहेत. या सर्व संचिकेला मान्यता दयावी अशी विनंती आहे.

श्री.संजय सिरसाट :मा.सभापती यांनी पत्र दिल्यानंतर गुंठेवारी भागात कामे करण्याच्या किती संचिका प्रलबींत आहे म्हणाून विचारणा केली व त्यानूसार त्यांनी त्यांचे अधिकारात सर्व ज्या १९ सचिंका होत्या त्या मागविलेल्या आहे. गुंठेवारी भागात देखभाल दुरूस्तीची कामे होतील म्हणून मा.आयुक्तांनी आश्वासन दिलेले होते. परंतू आताच आयुक्तांनी खुलासा केला की जो भाग गुंठेवारीत नियमीत होवू शकेल त्या भागात देखभाल दुरूस्तीची कामे करण्यास अडचण नाही तसे शासनाचे निर्देश आहे.कामे होत नाही म्हणून काही सदस्यांनी पत्र दिलेले नाही. तर जो भाग हा गुंठेवारीत आहेत व त्या भागात देखभाल दुरूस्तीची कामे असतील तर तसे त्या त्या सदस्यांनी पत्र दयावे व त्या पत्राचा विचार करून त्या त्या भागातील देखभाल दुरूस्तीची कामे होण्याबाबत कार्यवाही करावी. सेक्शन ६७(३)सी प्रमाणे अशी तातडीची कामे करण्याचे मा.आयुक्तांना अधिकार असेल तर ते देण्यात यावे. आठ दिवसात अशी गुंठेवारी भागातील कामाच्या संदर्भात स.सदस्यांचे पत्र घ्यावे व त्या गुंठेवारीच्या भागात देखभाल दुरूस्तीची कामे होण्यासाठी कार्यवाही करावी तसे आदेश मा.आयुक्तांना देण्यात यावे.

सौ. पार्वती वाघमारे : माझ्या वार्डात पिण्याचे पाणी लाईटची तसेच रस्ते व्यवस्थित नाही. रस्त्यावर खडकीकरण करण्यात आलेले नाही.गुंठेवारीत असल्यामूळे विकास कामे होत नाही

सौ.मेहरून्नीसा बेगम : वार्डामध्ये गुंठेवारी अंतर्गत व इतर कामेही त्वरीत करावे.

श्रीनारायण कुचे :पावसाळयात रस्त्यावर मोठमोठे खड्डे होतात. त्यानंतर ते रस्ते गुंठेवारीच्या नावाखाली दुरूस्त होत नाही. आमदार निधीतून काही भागात कामे होत आहे. नगरसेवकांच्या निधीतूनही झाली पाहिजे अशी मागणी आहे.

याच वेळी मा.महापौर यांचे डायस समोर स्वेच्छा निधीतून विकास कामे व्हावीत म्हणून मोठमोठयाने बोलतात काहीही ऐकू येत नाही.

मा.महापौर : आताच मा.सभापती यांनी ज्या १९ संचिका दिलेल्या आहे या संबधी आयुक्तांनी तात्काळ कार्यवाही करून तीन दिवसात त्या त्या भागात कामे सुरू करावी. व इतरही वार्डातील गुंठेवारी भागात करावयाची जी कामे असतील त्या संबधी तात्काळ ती कामे कशी सुरू करता येतील यासाठी प्रयत्न करावे.

श्री.अ.रशीद खान :३१ डिसेंबर ही नगरसेवक स्वेच्छा निधी वापरण्यास शेवटची तारीख आहे. स्वेच्छानिधीतून कोणतीही कामे झालेली नाही. मूदत वाढवून देण्यात यावी.

मा.महापौर :स्वेच्छानिधीतून कामे करण्यास एक महिण्याची मूदत वाढवून देण्यात येते.आता विषय पत्रिका घेण्यात येत आहे.

**विषय क्र. १२४/१ :**

दिनांक १९.१०.२००५ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणे.

मा.महापौर : इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

**ठराव** :

दिनांक १९.१०.२००५ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

**विषय क्र. १२५/२ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मार्च २००२ मध्ये ३८ शिक्षण सेवकांना नियुक्ती देण्यात आली होती. शासन निर्णय क्र.पी.आर.ई.२००३/१३३३० (३४७२) प्रा.शि.-१ शालेय शिक्षण विभाग मंत्रालय मुंबई -३२. दि.९.४.२००३ अन्वये शिक्षण सेवक कर्मचाऱ्यांची तीन शैक्षणिक वर्ष पूर्ण झाल्यानंतर नियमित वेतन श्रेणीत नियुक्ती देण्याबाबत मार्गदर्शक तत्वे ठरवून देण्यात आलेली आहेत. त्यानुसार सदरील नियुक्त केलेल्या ३८ शिक्षण सेवकांना वेतन श्रेणीमध्ये नियुक्ती देणे आवश्यक आहे. परंतु ९ शिक्षण सेवकांची जात प्रमाणपत्र वैध होऊन अहवाल प्राप्त झालेला नाही. त्यामुळे त्यांना वेतनश्रेणी देणे स्थगित ठेवून खालील दर्शविलेल्या शिक्षण सेवकांना आदेश निर्गमित झाल्याच्या तारखेपासून वेतन श्रेणी रूपये ४५०० ते ७००० ही वेतनश्रेणी देण्याचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

| अ.क्र. | शिक्षण सेवकांचे नांव | प्रथम नेमणूक दिनांक | ३ वर्ष पूर्ण झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| ०१ | श्री तडवी हुसेन नजीर | १५.३.२००२ | १४.३.२००५ |
| ०२ | श्री घायाळ रामदास आसाराम | १३.३.२००२ | १२.३.२००५ |
| ०३ | श्री बर्डे भरत विष्णू | १५.३.२००२ | १४.३.२००५ |
| ०४ | श्रीमती पवार ज्योतीबाला रामा | १३.३.२००२ | १२.३.२००५ |
| ०५ | श्री कांबळसुनिल कुमार काशीनाथ | ८.३.२००२ | ७.३.२००५ |
| ०६ | श्री सोळूंके भगवान मोतीराम | १४.३.२००२ | १३.३.२००५ |
| ०७ | श्रीमती शेळके शैलजा संभाजी | ९.३.२००२ | ८.३.२००५ |
| ०८ | श्री ताठे तुषार संपत | ८.३.२००२ | ७.३.२००५ |
| ०९ | श्रीमती पाटील अनिता शामराव | ११.३.२००२ | १०.३.२००५ |
| १० | श्रीमती किटे अनिता नामदेवराव | २३.३.२००२ | २२.३.२००५ |
| ११ | श्रीमती श्रेष्ठ रिता गोपीनाथराव | १३.३.२००२ | १२.३.२००५ |
| १२ | श्रीमती निकम मंगल देवराव | १३.३.२००२ | १२.३.२००५ |
| १३ | श्रीमती वैष्णव हेमा राधेश्याम | ९.३.२००२ | ८.३.२००५ |
| १४ | श्री अब्दुल अजीम अ.करीम | १३.३.२००२ | १२.३.२००५ |
| १५ | श्री शेख महमंद अलिम म.आजम | १३.३.२००२ | १२.३.२००५ |
| १६ | श्रीमती मारावार अलका लक्ष्मीनारायण | ९.३.२००२ | ८.३.२००५ |
| १७ | श्रीमती शिंदे मंगल पुंडलीकराव | १३.३.२००२ | १४.३.२००५ |
| १८ | श्रीमती निमगांवकर विजयालक्ष्मी बी. | ७.३.२००२ | १३.३.२००५ |
| १९ | श्री घुले सुदर्शन शिवाजी | १३.३.२००२ | ५.४.२००५ |
| २० | श्रीमती तायडे आम्रपाली त्र्यबंक | ९.३.२००२ | १४.६.२००५ |
| २१ | श्रीमती शिंदे वृषाली माणिकराव | १४.३.२००२ | १८.४.२००५ |
| २२ | श्रीमती पुरी आशा भिमराज | १४.३.२००२ | ७.४.२००५ |
| २३ | श्री झुंजूरडे धनराज सिताराम | १८.३.२००२ | १७.३.२००५ |
| २४ | श्री उबाळे शशीकांत मोहन | १५.३.२००२ | १७.३.२००५ |
| २५ | श्रीमती माळी रोहिण रंगनाथ | ८.३.२००२ | १९.६.२००५ |
| २६ | श्री. राहाणे केदार सोमीनाथ | ८.३.२००२ | ७.३.२००५ |
| २७ | श्री निवालकर गणेश भानुदास | ११.३.२००२ | १०.३.२००५ |
| २८ | श्रीमती रशिदा उन्नीसा अ.युसूफ | ११.३.२००२ | १०.३.२००५ |
| २९ | श्रीमती कुर्ले विजया सुदाम | १३.३.२००२ | १२.३.२००५ |

**संवाद :**

श्री.महेश माळवतकर :महानगरपालिकेत शिक्षण समिती अस्तित्वात असून शिक्षण समितीच्या संदर्भात जेही विषय असतील ते शिक्षण समितीमार्फत या सभागृहासमोर यावयास पाहिजे. हा विषय शिक्षण समिती मार्फत आलेला नाही. त्यामूळे शिक्षण समिती मार्फत येण्यास मान्यता देण्यात यावी.

मा.महापौर : शिक्षण समितीच्या संदर्भात जे विषय असतील ते शिक्षण समितीमार्फत या सभागृहा समोर यावे. हा विषय शिक्षण समिती मार्फत ठेवण्यात यावा.

**ठराव :**

प्रस्तुत प्रस्ताव शिक्षण समिती मार्फत ठेवण्यास मान्यता देण्यांत आली.

**विषय क्र. १२६/३ :**

अतिरिक्त शहर अभियंता, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, प्रभाग क्र.५७ अंतर्गत विविध ठिकाणी रस्त्याचे पुन:र्डांबरीकरण करणे. या कामाकरीता सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन २००४-२००५ च्या दरसूचीनुसार रक्कम रू.२३,४७,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील खर्च २००५-०६ या आर्थिक वर्षात पुन:र्डांबरीकरण या लेखाशिर्षाखाली करण्यात येणार आहे. सदर कामास मा.आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांनी शिफारस केली आहे व प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजूरीस्तव सादर करण्याचे आदेशित केले आहे.

करीता प्रस्ताव रू.२३,४७,०००/- मा.सर्वसाधारण सभेच्या मंजूरीस्तव विचारार्थ सादर.

मा.महापौर : विषय मंजूर करण्यांत येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्र.५७ अंतर्गत विविध ठिकाणी रस्त्याचे पुन:र्डांबरीकरण करणेच्या र.रू.२३,४७,०००/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १२७/४ :**

अतिरिक्त शहर अभियंता, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, रोशनगेट ते सेंट्रल नाका मुख्य रस्त्याचे डांबरीकरण करणे. या कामाकरीता सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन २००४-२००५ च्या दरसूचीनुसार रक्कम रू.२२,००,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील खर्च २००५-०६ या आर्थिक वर्षात पुन:र्डांबरीकरण या लेखाशिर्षाखाली करण्यात येणार आहे. सदर कामास मा.आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांनी शिफारस केली आहे व प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजूरीस्तव सादर करण्याचे आदेशित केले आहे.

करीता प्रस्ताव रू.२२,००,०००/- मा.सर्वसाधारण सभेच्या मंजूरीस्तव विचारार्थ सादर.

मा.महापौर : विषय मंजूर करण्यांत येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, रोशनगेट ते सेंट्रल नाका मुख्य रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या र. रू.२२,००,०००/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १२८/५ :**

शहर अभियंता हे खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर करीत आहेत की, औरंगाबाद महानगरपालिकेतर्फे शहरात मुख्य रस्त्यावर व विविध वॉर्डात पथदिवे लावण्यात आलेले आहेत. सदर पथदिव्यांची देखभाल व दुरूस्ती महानगरपालिका फंडातून करण्यात येते. या कामी अर्थ संकल्पात निधीची तरतूद करावी लागते. बऱ्याच वेळेस निधी अभावी तसेच अपुऱ्या तांत्रिक कर्मचाऱ्यांअभावी पथदिवे दुरूस्तीचे काम वेळेवर करता येत नाही. शहरातील ३० ते ४०% दिवे बंद असून, सध्या बंद असलेले दिवे सुरू करणे झाल्यास महानगरपालिकेस मोठ्या प्रमाणात खर्च करावा लागेल. सदर पथदिव्यांच्या विद्युत बिलापोटी महानगरपालिका दरमहा ३० ते ३५.०० लक्ष प्रतिमाह महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीस अदा करते.

महानगरपालिकेच्या मालकीचे सर्व पथदिवे चालू राहतील व त्याची देखभाल दुरूस्ती सुध्दा व्हावी यासाठी कोल्हापुर महानगरपालिकेच्या धर्तीवर BOT तत्वावर औरंगाबाद शहरातील अस्तीत्वातील पथदिव्यांच्या जागी Energy Saving (शुभ्र प्रकाश देणारे दिवे) प्रकारचे दिवे लावणेची संकल्पना पुढे आलेली आहे. याबाबत अनेक कंपन्या BOT तत्वावर Energy Saving Device वापरून त्यामुळे होणाऱ्या वीज बिलातील बचतीतून त्याचा खर्च काढून घेवून काही प्रमाणात महानगरपालिकेला रक्कम देण्यास तयार आहे. यामध्ये होणाऱ्या वीज बचतीमूळे महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीच्या विजबिलात जी बचत होईल, त्या बचतीमधुन खाली दिलेल्या अटींवर कंत्राटदार/कंपनी हे दिवे लावतील व विजबिलात होणाऱ्या बचतीमधून हे त्यांचा खर्च परस्पर काढून घेतील. यासाठी जाहीर निविदा सूचना प्रसिध्दी करण्यात येवून, खालीलप्रमाणे अ.क्र.१ ते ११ बाबींची पूर्तता करून किमान ४०% वीज बिलात बचत करणाची शास्वती देणाऱ्या कंत्राटदार/कंपनीस निविदा देण्यात येईल. बचत केलेल्या ४०% वीज बिलापैकी जो कंत्राटदार/कंपनी कमीतकमी हिस्सा मागेल त्यास हे काम देण्यात येईल.

उक्त प्रमाणे प्रस्तावामध्ये खालील बाबींचा समावेश करण्यात आलेला आहे.

०१. Energy Saving Contract अंतर्गत सर्व स्ट्रीट लाईट फिक्चर्स बदलून त्या ठिकाणी कंपनीचे Energy Saving फिक्चर्स लावणे.

०२. रात्रभर Uniform light राहील याची दक्षता घेणे.

०३. पॉवर फॅक्टर योग्य राहील. (०.९५ पेक्षा कमी असणार नाही.)

०४. सर्व लाईट उत्कृष्ट प्रतिचे राहतील, जेणे करून नागरीकांना त्रास होणार नाही.

०५. जर फिक्चर दुरूस्त करणे झाल्यास संपूर्ण Contract period मध्ये बदलून तसेच दुरूस्त करून देण्यात येईल.

०६. कमीत-कमी ९५% पथदिवे नेहमी चालू राहतील याची दक्षता घेणे.

०७. २४ तास तक्रार निवारण कक्ष कंपनीतर्फे चालविण्यात यावे.

०८. ४८ तासाच्या आत तक्रारींचे निवारण करण्यात यावे.

०९. वीज बचतीसाठी baseline ही सर्व पथदिवे चालू राहतील अशी असावी.

१०. सदर करार हा ७ वर्षासाठी राहील.

११. उक्त सर्व बाबींची पूर्तता करून वीज बिलात कमीत कमी ४०% बचत करणेची जबाबदारी ठेकेदाराची/कंपनीची असेल.

महानगरपालिकेस पथदिव्यांच्या विद्युत देयकापोटी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीस सर्व साधारणपणे दरमहा रूपये ३०.०० लक्ष विज देयक अदा करावेच लागते. विद्युत बिलात होणाऱ्या बचतीच्या रक्कमेतून कंत्राटदार/कंपनीस आपल्या हिश्यातून खालील प्रमाणे सुविधा पुरविणे बंधनकारक आहे. त्यामूळे यामध्ये महानगरपालिकेचे कोणत्याही प्रकारचे आर्थिक नुकसान होणार नाही. तसेच करार संपुष्टात आल्यानंतर कंत्राटदार/कंपनीने लावलेले दिवे व त्याद्वारे होणारी पूर्ण विज बचत ही महानगरपालिकेच्या मालकीची असेल.

१. कंपनीच्या पथदिव्याची Lux level, गुणवत्ता व दर्जा तपासण्यासाठी प्रायोगीक तत्वावर मुख्य रस्त्यावरील २५ खांबांवर कंत्राटदार/कंपनीस Energy Saving दिवे लावण्याची परवानगी देण्यात येईल. या कामाच्या खर्चाचा समावेश ESCO पध्दतीने करावयाच्या कामात करण्यात येईल. या दिव्यांची प्रकाशाची प्रत (Light/illumination quality) व विजबिलात होणारी बचत तपासले जाईल,होणारी बचत ४०% पर्यंत असल्यास समाधानकारक गृहीत धरली जाईल. व तद्नंतर शहरातील सर्व ठिकाणचे पथदिवे बदलण्याचे काम कंत्राटदार /कंपनीस टप्प्याटप्प्याने देण्यात येईल.

२. दिलेल्या रस्त्यावर दिवे बदलतांना दिवे सुरू करण्यासाठी इतर किरकोळ दुरूस्त्या यामध्ये केबल दुरूस्ती, चोक बदलणे, जंक्शन बॉक्स सुस्थितीत नसल्यास तो सुस्थितीत ठेवणे व इतर अनुशांगिक देखभाल देखभाल दुरूस्तीची कामे कंपनीस स्वखर्चाने करावी लागतील. थोडक्यात

दिवे चालू स्थितीत राहतील यासाठी करावयाची सर्व प्रकारची देखभाल दुरूस्तीची कामे कंपनी/ठेकेदारास स्वखर्चाने करावी लागतील.

३. कंपनीस आपले स्वत:चे कार्यालय औरंगाबाद शहरात उघडावे लागेल. आवश्यक तो तांत्रिक/अतांत्रिक कर्मचारी वर्ग ठेवावा लागेल. कार्यालयात दुरध्वनीची व्यवस्था, तसेच २४ तास तक्रार ऐकूण घेण्यासाठी Shift wise कर्मचाऱ्यांची नेमणूक करावी लागेल.

४. ४८ तासांचे आत तक्रारीचे निवारण झाले पाहीजे. तक्रार आल्यानंतर तक्रारीस क्रमांक देवून त्या तक्रार निवारणा विषयी दररोज अहवाल महानगरपालिकेस सादर करावा लागेल.

५. कमीत कमी ९५% दिवे सुरू राहतील याची जबाबदारी कंपनीची असेल.

६. शहरातील किमान ९५% दिवे सुरू असतांना होणारी विज बचत हीच विज बचत ग्राह्य धरण्यात येईल, अन्यथा नाही.

७. या कामामुळे होणाऱ्या देखभाल दुरूस्तीच्या बचती मधील हिस्सा कंपनीने मागता कामा नये.

८. दिव्यांची चोरी, नुकसान (With natural calamities and unavoidable circumstances) याची जबाबदारी कंपनीची असेल.

९. सध्याचा महाराष्ट्रातील वीज वितरण कंपनीचा KWH rate हा रूपये ३.०० प्रति Kwh [Unit] असेल. त्यानुसार बचतीचे गणित मांडले जाईल. यात महाराष्ट्र विज वितरण कंपनीने काही बदल केल्यास त्यानुसार गणित मांडले जाईल व हा बदल कंपनीस बंधनकारक राहील.

१०. संपूर्ण शहरात साधारण एक वर्षाच्या आत Phase wise पध्दतीने कंपनी सर्व Phase (एकूण चार टप्पे) चे दिवे (नवीन Energy Saving प्रकारचे) लावील.

११. Phase wise पध्दतीने संपूर्ण शहरासाठी किंवा अंशत: Energy Saving प्रकारचे दिवे लावण्यास कंपनीला परवानगी देण्याचा निर्णय कंपनीची कामाची पध्दत, त्यातुन मिळणारे परिणाम (performance etc) पाहून मा.आयुक्त,महानगरपालिका हे घेतील. या कामामुळे योग्य तो परिणाम साधल्या जात नसेल तसेच महानगरपालिकेचा आर्थिक तोटा होत असल्याने दिसून आल्यास त्याच प्रमाणे करारनाम्यातील अटी/शर्तीचा भंग कंपनी करत असल्याचे निदर्शनास आल्यास करारनामा रद्द करण्याचा अधिकार मा.आयुक्त यांना असेल.

१२. सात वर्षानंतर कामाचा आढावा घेवून पून्हा अशाच प्रकारचा करार करणे किंवा प्रती खांब/ प्रती Fixture प्रती ट्युबची प्रती वर्षात एक विशिष्ट रक्कम देवून दुरूस्ती करणे या पध्दतीने ठेकेदार / कंपनीस देखभाल दुरूस्तीचे काम देणे याबाबत निर्णय घेण्याचा अधिकार मा.आयुक्त यांना राहील.

१३. कंपनीस स्वखर्चाने संपूर्ण शहराचे दिव्यांचे खांबांचे सर्वेक्षण स्वखर्चाने करून सर्व खांबावर ऑईल पेंटने क्रमांक द्यावे लागतील.

१४. कंपनीने हे काम Lux Parameters आणि पथदिव्यांच्या सध्याच्या खांबांची उंची न बदलता करणे बंधनकारक राहील.

१५. सध्या अस्तित्वातील पथदिव्यांच्या सर्व मिटर्सची तपासणी कंपनीने स्वखर्चाने करावी. बिघडलेले मिटर्स महाराष्ट्र विज वितरण कंपनीकडून दुरूस्त करून घेणे किंवा बदलून दुसरे लावणे ही कामे कंपनीस करावी लागतील. या बाबतीत कंपनीस उर्जा परिक्षण करावे लागेल आणि त्याचा संपूर्ण खर्च कंपनीस करावा लागेल.

१६. पथदिव्यांच्या एक महिन्याच्या विजेच्याConsumptionची नोंद Kwh मध्ये कंपनीने ठेवावी.त्यासाठी कंपनीने महाराष्ट्र विज वितरण कंपनीच्या मीटर शेजारी स्वत:चे Calibrated Energy meter लावावे. जर कंपनीच्या मीटरमध्ये आणि महाराष्ट्र विज वितरण कंपनीच्या मीटरमध्ये तफावत आढळल्यास विज वितरण कंपनीस मीटर दुरूस्त करणे/बदलावयास लावणे ही कामे कंपनीस करावी लागतील.

१७. कंपनी ESCO (Energy Saving Contract) अंतर्गत जी कामे करील, त्यासाठी वापरण्यात येणाऱ्या साहित्यासाठी नियमाप्रमाणे जकात कर महानगरपालिकेकडे नियमीतपणे भरणा करील. त्यासाठीचे धोरण मा.आयुक्त हे ठरवतील.

१८. विज बचतीमधुन कंपनीस द्यावयाचा हिस्सा कंपनीने देयक सादर केल्यानंतर जास्तीत जास्त १५ दिवसांचे आत कंपनीस महानगरपालिकेकडून अदा करण्यात येईल.

१९. ठेकेदार/कंपनीने नागरीकांची तक्रार प्राप्त झाल्यानंतर ४८ तासांचे आत तक्रार दूर केली पाहीजे. अन्यथा ज्या खांबावरील पथदिव्याची तक्रार असेल, त्याबाबत विलंब झालेल्या प्रत्येक दिवसासाठी प्रती खांब रूपये १००/- दंड आकारण्यात येईल.

२०. निविदाधारकातर्फे बसविण्यात येणाऱ्या Energy Saving Devices ची Lux level ही पूर्वी महानगरपालिकेने बसविलेल्या HPSV फिटींग इतकी येत असल्याबाबतचे प्रमाणित करणे बंधनकारक असेल व याबाबतचा Lux level दर्शविणारा तुलनात्मक तक्ता सादर करणे बंधनकारक असेल.

२१. ठेकेदारांनी स्वत:च्या खर्चाने टी-५ टेक्नॉलॉजी एनर्जी एफिशियन्ट स्ट्रीट लाईट फिटींग पुरविणेची, बसविणेची व सध्याची काढलेली स्ट्रीट लाईट फिटींग,ट्यूब,दिवे व इत्यादी महानगरपालिकेच्या ताब्यात देणे बांधनकारक राहील. याबाबत महापालिका कोणत्याही प्रकारचा खर्च करणार नाही.

२२. वरील ७ (सात) वर्षाच्या कॉंट्रेक्ट पीरीअडमध्ये ठेकेदार यांनी बसविलेल्या ट्यूब,दिवा व इतर युनीट यांची देखभाल दुरूस्ती स्वखर्चाने ठेकेदार/कंपनीने स्वत:चे मटेरियल व लेबर वापरून करणे बंधनकारक राहील.

२३. प्रत्येक पोल वरील बसविलेले ट्यूब, दिवे व इतर यूनीट नियमीत चालू ठेवणेच्या दृष्टीने ठेकेदार यांनी कार्यरत रहावयाचे आहे. यामध्ये आवश्यकतेनुसार महाराष्ट्र विद्युत वितरण कंपनी यांच्याशी संपर्क साधून पूर्तता करून घेणेची आहे.

२४. ठेकेदार यांनी सध्याचे ४०/३६ वॅट ट्यूब ठिकाणी टी-५ टेक्नॉलॉजीची २८ वॅटची ट्यूब, ७० वॅट HPSV फिटींगचे ऐवजी १४×४ वॅटचे टी-५ टेक्नॉलॉजीचे ट्यूब बसविणे, १५० वॅट HPSV चे ऐवजी २४×४ वॅटचे टी-५ टेक्नॉलॉजीचे ट्यूब बसविणे, २५० वॅट ऐवजी २४×५ वॅटचे टी-५ टेक्नॉलॉजीचे ट्यूब बसविणे बंधनकारक आहे. या सेट मधील सर्व ट्यूब चालू राहतील व रस्त्यावर रहदारीसाठी पुरेसा उजेड राहील याची दक्षता घेणे कंपनीवर बंधनकारक राहील.

२५. ठेकेदार यांनी योग्य त्या क्षमतेचे टाईमर स्वीच प्रत्येक स्वीच पॉंईटवर स्वखर्चाने बसविणेचे आहे. तसेच सदरचे ॲटो टाईमर महाराष्ट्र विद्युत वितरण कंपनी व विद्युत निरिक्षक पी.डब्ल्यु.डी., औरंगाबाद यांच्याकडून प्रमाणित करून घेवून बसविणे बंधनकारक आहे.

२६. ठेकेदार/कंपनी यांचे चूकीने किंवा त्यांच्या चुकीच्या कामकाज पध्दतीमूळे अगर इतर कारणाने करार रद्द झाल्यास महानगरपालिका ठेकेदार/कंपनीस कोणतीही नुकसान भरपाई देणार नाही. या कामी आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांचा निर्णय ठेकेदार/कंपनीवर बंधनकारक राहील.

२७. ठेकेदार/कंपनी यांची कराराची मुदत संपल्यानंतर बसविलेले सर्व ट्यूब लाईट, दिवे व इतर युनीट महापालिकेकडे विनामुल्य हस्तांतर करणेचे ठेकेदार/कंपनीवर बंधनकारक राहील.

२८. ठेकेदार/कंपनी यांचेवर महापालिकेकडून दिलेल्या सूचनेनुसार टाईमर स्वीच बंद चालू करणेची वेळ पाळणे बंधनकारक राहील.

२९. शहरातील सध्या अस्तित्वात असलेल्या पथदिव्यांमध्ये दरवर्षी नव्याने विकसीत होणाऱ्या भागात नविन दिव्यांच्या उभारणीमूळे पथदिव्यांच्या संख्येत वाढ होवू शकते. या वाढीव खांबावर ठेकेदार/ कंपनी त्यांचे कडील Energy Saving प्रकारचे दिवे/ट्यूब लावतील. त्यामूळे होणाऱ्या एकंदर बचतीवरून प्रत्येक दिव्यामागे होणारी बचत काढली जाईल आणि त्याप्रमाणे ठेकेदार यांना बचतीचा मोबदला दिला जाईल.

तरी वरीलप्रमाणे प्रस्ताव विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर. प्रस्ताव मान्यतेनंतर निविदेची पुढील कार्यवाही करण्यात येईल.

**संवाद :**

श्री.सलीम खान : ६ वार्ड कमेटीनूसार विदयूत खाजगीकरणाचे काम विभागून देण्यात यावे.एकाच ठेकेदारास देण्यात येवू नये.

मा.आयुक्त : २-३ एजन्सीनी तयारी दर्शविली होती. आम्ही फिटींग बदलून ४०% बचत करू व त्यांनी विकत घेण्याबाबत सूचविले मी त्यांना बोललो बचत होणार नसेल तर मोफत पैसा मिळणार नाही. त्यांना बचत किती होईल हे दाखवायला सांगितले व बचतीचे किती टक्केवारी घेणार. आवश्यकतेप्रमाणे उजेड मिळायला पाहीजे. ते मिळेल का, याचीही विचारणा केली. प्रकाश कमी न होता विज बिलात बचत होत असेल तर प्रायोगिक तत्वावर करून घेण्यास हरकत नाही. हा प्रस्ताव एजन्सीसह नाही, धोरणात्मक निर्णयासाठी ठेवला आहे.

श्री.रेणूकादास वैद्य :यापूर्वी काही रस्त्यावर खाजगी संस्थेमार्फत लाईट बसविण्यात आलेले होते त्याची आजची स्थिती काय आहे खुलासा घेण्यात यावा.त्यानंतर यावर विचार करावा.

मा.आयुक्त :यापूर्वी ज्या संस्थेनी हा ट्रायल बेसीसवर करून दाखवले त्यांचे काम चांगले वाटले. पूर्वी त्याएजन्सीचे असे प्रपोजल होते की एनर्जी सेव्हींगमधे आम्ही टक्केवारी घेणार परंतु काहींचे पत्र आलेले होते की या व्यतिरिक्त त्यांनी असे सांगितले की प्रत्येंक पोलसाठी ४५ रूपये पाहिजे.परंतू मला असे वाटले की सेव्हींगच्या व्यतिरिक्त काही पैसे दयायचे असतील तर देता येणार नाही. डायरेक्ट देता येणार नाही म्हणून मी त्या एजन्सीला म्हटले. जे सर्वात कमी मधे घेईल त्यांना दिल्या जाईल. त्यांमूळे या प्रस्तावास मान्यता दयावी. टेंडर काढून स्थायी समितीची मान्यता घेवून कार्यवाही केली जाईल.

मा.महापौर :यात पथदिवे,सोडीयम वेपर लावणार की ट्यूब लाईट लावणार आहे.

मा.आयुक्त : सुरूवातीत ५ हजार पोलसाठी निर्णय घ्यावा चांगले काम दिसून आले तर पूढील कार्यवाही करता येईल. जेवढा प्रकाश अपेक्षीत आहे तेंव्हढा मिळाला पाहिजे. सदर जो कुणी ठेका घेईल. ते वीज बचत करतील व तांत्रिकदृष्ट्या पाहिजे तेव्हढाच प्रकाश मिळावा..

डॉ.भागवत कराड : २६००० पोल काही थ्रीसेट व चार सेट यात सदर जो कत्रांटदार काम घेईल ती एजन्सी सर्व स्ट्रीट लाईट फिक्चर्स बदलून त्या ठिकाणी कंपनीचे एनर्जी सेव्हींग फिक्चर्स लावणार आहे. यामूळे महानगरपालिकेने लावलेले फिक्चर्स हे वाया जाणार असून महानगरपालिकेचे यात नुकसान होणार आहे या फिटींगचे महानगरपालिका काय करणार. ७ वर्षानंतर करार संपल्यावर त्याच कंपनी कडून काम करून घ्यावे लागेल. त्यासाठी सदर जो कूणी ठेका घेईल ती कपंनी पूर्वीच्या फिक्चर्स मधे बदल करणार नाही व त्यावर एनर्जी सेव्हींग डिवाईस लावून वापरता येईल व ज्या कंपनी पूढे येतील त्यांचेशी वाटाघाटी करून जे महानगरपालिकेच्या हिताचे होईल अशा प्रकारे निर्णय घ्यावा.तसा प्रस्ताव यासभागृहासमोर सादर करण्यात यावा.

श्री.प्रशांत देसरडा :यात एनर्जी सेव्हिंग ,एनर्जी फिटींग,तसेच प्राव्हेटेशन लाईट देखभाल दुरूस्ती करणे असे तीन वेगवेगळे विषय आहेत. हे तीनही विषय एकत्र करून चुकीच्या मार्गाने प्रस्ताव ठेवून एक वेगळया दिशेने प्रशासन चाललेले आहे असे वाटते.कोल्हापूर महानगरपालिकेच्या धरतीवर ही योजना राबवायची असून माझ्या माहितीप्रमाणे कोल्हापूर महानगरपालिकेने १०० टक्के असा प्रकल्प राबविलेला नाही. सदर महानगरपालिकेने एनर्जी सेव्हींग फिटींग जसे या महानगरपालिकेत

ट्रायल बेसेसवर केलेले आहे त्याप्रमाणे कार्यवाही सदर महानगरपालिकेने केलेली आहे. एनर्जी सेव्हींग फिटींग बदणार असे दिले आहे. या शहरात २५ हजार पेक्षा जास्त पोल असून नवीन एनर्जी सेव्हींग फिटींग लावणार आहे. त्यातून जे सेव्हींग होईल त्यातून सदर कंपनी देखभाल दुरूस्तीची कामे करणार आहे.अशा पधदतीने प्रस्ताव ठेवलेला आहे. जुने फिटींग काढून काय करणार आहे. या व्यतिरिक्त आणखी काही प्रपोजल महानगरपालिकेकडे आलेले आहे काय याचाही प्रशासनाने खुलासा करावा.लाईट बिलात बचत करू शकतात .व देखभाल दुरूस्तीसाठी सदर कंपनी इच्छुक आहे अशा किती एजन्सीजचे प्रपोजल महानगरपालिकेकडे आलेले आहे. आहे त्याच फिटींग मध्ये दिवे लावून वीज बिलात बचत होईल का? असे दोन्ही प्रस्ताव या सभागृहासमोर यावयास पाहिजे होते.परंतू तसे झालेले नाही.आताच खुलासा केला की फक्त पाच हजार पोलवर हे काम करावे. याचा अर्थ प्रशासन यावर ठाम नाही.एनर्जी फिटींग बदलण्याचे एनर्जी सेव्हींग होईल का असा प्रश्न पडतो. तसेच लाईटचे खाजगीकरण करण्या बाबत ठराव पारीत केलेला आहे त्याची अमबजावणी अदयाप झालेली नाही त्याचाही खुलासा करण्यात यावा.तसेच ज्या फिटींग ट्रायल बेसेसवर लावण्यात आलेल्या आहेत त्या आयएसआय मार्कस्च्या आहेत का?जर आयएसआय मार्कस् असून सूध्दा एनर्जी सेव्हींग न झाल्यास ऑडीटमधे अडचण येईल.प्रस्तावातसुध्दा आयएसआय मार्कस्च्या फिटींग वापरणार आहोत असे दिलेले नाही.आयएसआय व्यतिरिक्त वापरणार आहोत का याचाही खुलासा करावा तसेच प्राव्हेटेशनचा ठराव मंजूर केलेला असतांनाही आतापर्यत अमलबजावणी का करण्यात आलेली नाही. २५००० फिटींगस्चे पुढे काय करायचे.

मा.आयुक्त :एकदम २५ हजार पोलवर फिटींग बदलू शकणार नाही. व बदलणार ही नाही. हे धोरण मान्य झाल्यानंतर जी एजन्सी कमीत कमी खर्चात करेल किंवा महानगरपालिकेस जास्तीत जास्त फायदा करून देतील.त्या एजन्सीकडून पाच हजार पोलवर फिटींग लावून घेवू .ज्या पोलवर नवीन फिटींग होणार आहे त्या पोलवरील जूनी फिटींग ही महानगरपालिकेच्या इतरत्र बंद असलेल्या पोलवर लावता येईल. काढून ते ठेवता येणार नाही,बंद तेथे लावायचे फिडरवाईज देणार आयएसआय किंवा बीएसआय मार्कस् असावेत ते अटी शर्तीमधे टाकण्यात येईल. एनर्जी सेव्हींग हे दोन प्रकारे करता येते पॅनेल बोर्ड लावून त्याद्वारे तसेच जुन्या फिटींगच्या मध्ये नविन तंत्रज्ञान वापरून सेव्हींग होवू शकते. प्रस्ताव हा स्ट्रीट लाईट फिक्चर्स बदलून त्या ठिकाणी कंपनीचे एनर्जी सेव्हींग फिक्चर्स लावून सेव्हींग करणार आहेत. असा आहे. यानंतर आणखी कोणती एखादी एजन्सी वेगळया पध्दतीने जास्तीत जास्त एनर्जी सेव्हींग करीत असेल तर त्यांनाही देण्यास हरकत नाही पॅनेल बोर्ड मधे बदल करून किती बचत होते व किती नवीन फिंटीग मूळेसेव्हींग होणार आहे याचा विचार करून संबधीत एजन्सी बरोबर निर्णय घ्यावा लागेल.याचा अर्थ असा नाही की यानंतर नवीन कोणत्याही एजन्सीशी एनर्जी सेव्हींगसाठी कार्यवाही करता येणार नाही. देखभाल दुरूस्तीचा यासाठी ठेवले की पाच हजार पोलवर लाईट लावल्यानंतर लगेच एखादया ठिकाणी लाईट बंद पडल्यानंतर २४ तासाच्या आत संबधीत एजन्सी लावेल. हे करीत असतांना सदर एजन्सीने ४० टक्के वीज बिलात बचत करावयास पाहिजेत. किती टक्के महानगरपालिकेस देणार व किती टक्के सदर एजन्सीने घ्यावे याप्रमाणे निविदा भरतील.यात देखभाल दुरूस्तीसाठी लागणारा खर्च बचत होईल तसेच एनर्जी

सेव्हींगमधेही बचत होणार आहे. जे सर्वात जास्त महानगरपालिकेचा फायदा करतील अशांना हे दिले जाईल. २५ हजार पोल पैकी ५ हजार याप्रमाणे कार्यवाही केल्यानंतर उर्वरीत जे राहतील त्या बाबतीत सर्वसाधारण सभेने ठराव मंजूर केलेला आहे त्याप्रमाणे कार्यवाही होईल.

श्री.देसरडा प्रशांत : कोल्हापुर,उल्हासनगर व नवि मुंबई यांनी फिटींग न बदलता एनर्जी सेव्हींग केलेली आहे. याचा अभ्यास करावा.

श्री.संजय सिरसाट :एखादे काम करायचे नसल्यास व कामाची जबाबदारी ही दुसऱ्यावर ढकलण्यासाठी सोयीस्कर मार्ग म्हणजे खाजगीकरण लाईटसाठी बजेट किती आहे व खर्च किती होतात हे प्रशासनाला सांगता येत नाही. गेल्या सहा वर्षात माझ्या वार्डात केव्हा लाईट बदलले व चौक बदलला हे कळालेलेच नाही. एखादया ठिकाणी लाईट बंद नसतो वायर खराब झालेले असते तरी सुध्दा लाईट बदलला जातो. तेथून काढलेला लाईट कुठे जातो कळायला मार्ग नाही स्टोअरमधे ही जमा होत नाही.मोठया प्रमाणात लाईटवर बजेट ठेवले असतांनाही कोणत्याही वार्डात ९० टक्के लाईट चालू आहे असे कुणीही सांगणार नाही. याचा अर्थ विदयूत विभाग कडून ऑलरेडी ५० टक्के सेव्हींग होत आहे हे करण्याची गरज नाही.यापूर्वी टायमर लावण्याची नवीन कल्पना समोर आली त्यानूसार टायमर ३० ते ४० लक्षचे टायमर लावण्यात आले. काही सदस्य तक्रार करतात की वार्डात लाईट बंद आहे.मी तक्रार करतो माझ्या वार्डात दिवसा लाईट चालू असतात.याचा अर्थ असा की एकदाचे टेंडर काढायचे दुसऱ्यावर जबाबदारी टाकायची .महापालिकेचा पैसा खर्च करायचा कार्यवाही ठरल्याप्रमाणे होते किंवा नाही याकडे कुणाचे लक्ष नसते.जी लाईट फिटींग करणार आहोत त्याची गॅरंटी १८ हजार तासाची आहे. याचा अर्थ तीन वर्ष खराब होणार नाही. जर खराब होणार नसेल तर देखभाल दुरूस्तीची गरज काय?,एकदा लाईट लावल्यानंतर तो तीन वर्ष चालू राहणार आहे असे या प्रस्तावात कंपनीचे म्हणणे आहे ते मा.आयुक्तानी मान्य केलेले आहे.यात नेमके सेव्हींग काय होणार आहे. संबधी एजन्सी मालक हा त्याचे खर्चाने लाईट लावणार आहे. त्यातून टक्केवारीनूसार संबधीतास देणार आहोत व महानगरपालिकेस यातून किती फायदा होणार आहे याचा खुलासा अगोदर करावा.एकही पैशाचा फायदा होणार नाही असे माझे मत आहे. पहिल्यांदा सदर एजन्सी ही ९५ टक्के, ९० टक्के ,८५ टक्के त्यानंतर ८० टक्के सेव्हींग घेणार याचा अर्थ ५ टक्केसाठी ही उलाढाल चालू आहे. हे काम एजन्सी मार्फत न करता एका फिटींगसाठी किती खर्च लागतो त्याप्रमाणे सरासरी काढावी महापालिकेच्या वतीने कार्यवाही करावी जसे पाणीपूरवठयाच्या बाबतीत जलवाहिनीसाठी पाईप मागविले त्याप्रमाणे महानगरपालिकेने कंपनीकडील फिटींग मागवावे महानगरपालिकेचा यात फायदा होईल.महानगरपालिकेकडे पाच हजार पोलसाठी खर्च नसेल तर दोन हजार पोलवर अगोदर ट्रायल बेसीसवर लावण्यात यावे. व देखभाल दुरूस्तीसाठी एजन्सीला देण्यात यावे. मेंटनन्सला माझा विरोध आहे. महानगरपालिकेच्या माध्यमातून करावे. बजेट कमी असेल तर प्रत्येक नगरसेवकांच्या वार्डातील ५ ते १० लक्षपर्यतची कामे कमी करून तरतूद करावी. एजन्सीकडे हे काम दिले तर ठेकेदारी पध्दत वाढेल आजच्या स्थितीला अधिकारी हे नगरसेवकांचे तक्रारी सोडवत नाही ठेकेदार ऐकेल याची खात्री नाही.

मा.आयुक्त :यात दोन पध्दतीने कार्यवाही करता येईल. आताच सभागृहनेता यांनी सांगितल्यानूसार महानगरपालिकेच्या वतीने फिटींग विकत घेणार तीन वर्ष गॅरंटी

राहील.त्यानंतर जे देखभाल दुरूस्ती लागेल ते महानगरपालिकेला करेल.दुसरे असे की महानगरपालिकेने फिटींग मागवले व ऑलरेडी कितीची सेव्हींग करीत आहे.त्यातून किती रक्क्मेचा फायदा होत आहे. १८ हजार तास चालणार आहे म्हणून काही होणार नाही यांचे सूध्दा कॅल्क्यूलेशन करून किती टक्के संबधीत एजन्सीने घ्यावे व किती टक्के महानगरपालिकेने घ्यावे हा दुसरा मार्ग आहे. या प्रस्तावानूसार महानगरपालिकेला फिटींग विकत घेण्यासाठी गरज नाही उलट सेव्हींगमधून महानगरपालिकेला रक्कम मिळणार आहे.कॅल्क्यूलेशन करतांना हा विचार केला जाईल की सेव्हींगमूळे किती रक्क्म मिळत आहे व फिटींग महानगरपालिकेने घेतल्या असल्या तर किती फायदा झाला असता.देखभाल दुरूस्तीसाठी ६ टेंडर काढण्याऐवजी जे पाच हजार पोलवर काम करीत आहोत त्या बाबतीत त्यांना बीओटी पध्दतीने दयायचे .२५ हजार पोलसाठी २ कोटी लागत असेल तर पाच हजार पोलसाठी किमान ४० लक्ष ठेवले जातील ती महानगरपालिकेची सेव्हींग होईल. जे पाच हजार पोलवर फिटींग लावणार आहे तेथील फिटींग काढून जेथे नाही तेथे त्या लावता येतील. पैसे खर्च न होता काम होणार आहे. सर्व बाबींचा विचार करून कार्यवाही होईल.

श्री.संजय सिरसाट :एनर्जी सेव्हींग होणार आहे. पाच हजार पोलवर फिटींग लावणार आहेत. उर्वरीत लाईटच्या देखभाल दुरूस्तीसाठी प्राव्हेटेशन करावेच लागणार आहे.पाच हजार पोलवरील लाईट तीन वर्षाच्या आत बंद पडला तर रिप्लेशमेंट म्हणून बदलून मिळणार आहे.

मा.आयुक्त :एक दोन कोटी जे ठेवावे लागणार आहे ते एनर्जी सेव्हींग मधून काम केले तर ठेवण्याची गरज नाही. तीन वर्ष ते या पोलवर सेवा देणार आहे टप्प्या टप्प्याने हे करीत आहोत. फिटींग विकत घेवून लावणे महानगरपालिकेला फायदयाचे होणार नाही.

श्री.रेणुकादास वैद्य : सर्व अत्यावश्यक आहे. प्रायोगिक तत्वावर करावे.

श्री.हिम्मतराव दाभाडे :वार्डात लाईटची व्यवस्था होत नाही नागरीकांना मोठया प्रमाणात त्रास होत आहे. केव्हा व्यवस्था होणार आहे. लाईटचे खाजगीकरण करण्यात येवू नये यामूळे नागरीकांची गैरसोय होईल..आहे त्याच पध्दतीने काम करावे.

मा.उपमहापौर :बऱ्याच वेळपासून या विषयावर चर्चा चालू असून अनेक स.सदस्यांनी वेगवेगळे मत व्यक्त केलेले आहे.परंतु महत्वाचे असे की देखभाल दुरूस्तीसाठी खाजगीकरण करणे आवश्यक आहे. आजची परीस्थिती अशी आहे की प्रत्येक वार्डात किमान २५ ते ३० टक्के लाईट बंद आहे. फिक्चर्स न बदलता याच फिक्चर्सवर कोणी सेव्हींग करीत असेल तर त्यांना हे काम देण्यात यावे.तसेच सात वर्षानंतर जर पून्हा लाईट किंवा नवीन फिटींग करावे लागत असेल तर चुकीचे होणार आहे.ज्या कंपनीचे फिक्चर्स बसवले त्याचे मटेरीयलची किमंत वाढली तर पुन्हा तेच मटेरीयल जास्त किमतीत घ्यावे लागेल व महानगरपालिकेस खर्च लागेल.त्यासाठी फिक्चर्स न बदलता आहे त्याच फिटींगवर सेव्हींग एजन्सी करीत असेल तर तसा प्रस्ताव सादर करण्यात यावा.

डॉ. भागवत कराड :वार्डात लाईट बंद आहे या संदर्भात प्रत्येक नगरसेवकांच्या तक्रारी आहेत. विदयूतीचे काम होत नाही. म्हणून त्यांचेवर आरोप आहे. खाजगीकरण करणे योग्य आहे, परंतू जुने जे फिक्चर्स आहे ते न बदलता त्यावरच लाईट लावून एनर्जी सेव्हींग होवू शकते.या संदर्भात स.सदस्य श्री. प्रशांत देसरडा यांनी मा.आयुक्त यांना तसे पत्रही दिलेले आहे. व जे दर दिलेले आहे त्या

बाबतीत मा.आयुक्त यांनी स्टेटमेंट केलेले आहे. जे ३० लक्षचे बिल येते .त्यात ४० टक्के सेव्हींग होणार असून जवळपास १२ लक्षची सेव्हींग होणार आहे. त्यासाठी फिक्चर्स न बदलता आहे त्याच फिक्चर्सवर सेव्हींग करण्याचा प्रस्ताव प्रशासनाने सादर करावा असे माझे मत आहे.

श्री.वसंत नरवडे :आजही शहरात प्रत्येक वार्डात ३० टक्केच लाईट चालू आहे. जे पथदिवे लावण्यात आलेले आहे. तेकिती उंच आहे व त्यामूळे खाली किती प्रकाश पडतो यांचे स्वत:आपण निरीक्षक करावे. टायमर लावून लावलेले मिटर यामूळे जे एव्हरेज बिल येत आहे.जेथे मिटर नाही तेथे एवरेज बिल येत आहे यामूळे महानगरपालिकेचे नुकसान होत आहे. एक वार्डात प्रायोगिक तत्वावर अशी कार्यवाही करून पहावी. यात किती सेव्हींग होते. किती मीटर लावण्यात आलेले आहे. किती लाईट लावू शकतो.जो लाईट लावण्यात येतो तो चांगल्या दर्जाचा लावण्यात येत नाही. आयएसआय मार्कस्चा नसतो. त्यामूळे पाहिजे तेव्हढा प्रकाश नाही.असे आजही दिसून येते. एक वार्डात टायमर लावून किती फायदा होवू शकतो व एका वार्डात एनर्जी सेव्हींग केल्यामूळे किती फायदा होवू शकतो. ट्रायल बेसेसवर ही कार्यवाही करण्यात यावी. ते बघून या प्रायोगिक तत्वास मान्यता देण्यात यावी. एमएसईबीने प्रत्येक घरात इलेक्ट्रानिक मीटर बसविलेले असून महानगरपालिकेच्या पोलवर का बसविलेले नाही. जूनेच मीटर आहे व त्या मीटरची रिडींग ही अतिजलद आहे. यावर टायमर बसवूनही सेव्हींग होवू शकते. अधिकाऱ्याना सर्वे करण्यास सांगावे. त्यानंतर या प्रस्तावानुसार कार्यवाही करावी.

सौ. कला बोरमणीकर :हा प्रस्ताव येणार आहे म्हणून वार्डात देखभाल दुरूस्तीची कामे होत नाही. वार्ात ५० टक्के लाईट बंद आहे. कोणीही अधिकारी कर्मचारी येवून बघून जातात काम करीत नाही.आहे ते लाईट चालू करण्याचे अगोदर आदेश दयावेत. हा प्रस्ताव पूढील वर्षासाठी ठेवावा. त्यावर अभ्यास करून निर्णय घेता येईल.

श्री.अ.रशीद खान : महानगरपालिकेस लाईट बिला पोटी महिण्याला ३० लक्ष बिल येत आहे. काही पोलवर मीटर बसवलेले नाही. काही लोकांनी आकडे टाकून घरामधे दुकानमधे लाईट घेतलेली आहे. त्याची अगोदर चौकशी करण्यात यावी. जे पाच हजार पोलवर लावण्या बाबत सूचवले. तर कोणत्या ठिकाणी लावणार आहे. तसेच जुने फिटींग काढल्यानंतर त्या साहित्याचे काय करणार आहेत. तो माल विक्री होणार आहे का यापूर्वी जे जूने साहित्य काढण्यात आलेले आहे त्याचे रेकॉर्ड नाही. रजिष्टर ठेवले जात नाही. हा संपूर्ण खूलासा होणे गरजेचे आहे. तसेच ही कार्यवाही करीत असतांना एखादयाचा मृत्यू झाला तर जबाबदारी कुणाची संपूर्ण खूलासा करावा. ही कार्यवाही करतांना एक वार्डापूरती अगोदर करावी . जर पाच हजार पोलवर हे पथदिवे लावणार आहे तर त्याचाप्रकाश पाहिजे तेव्हढा मिळणार आहे का याचाही खुलासा करावा. लाईनमन वार्डात लाईट लावण्यासाठी येतात. नगरसेवकांना माहिती देत नाही. चार लाईट घेवून येतात दोनच लावतात. पावर हाऊसचे लाइनमनवर आपले काम अवलंबून असते.

मा.आयुक्त : किती पथदिवे बंद आहे व आणि कितीचे प्रपोजल करावयास पाहिजे या संदर्भात दिवाळीपूर्वी ३०,३१ ऑक्टोबर रोजी सर्वे करण्यात आलेला होता. तर एकूण ५,०९२ पोलवर लाईट बंद होते. म्हणून हा विचार केलेला आहे की सुरूवातीस पाच हजार पोलसाठीच निर्णयघ्यायचे ठरलेले आहे दोन वर्षापासून नवीन काही घेतलेले नाही. फिटींग विकत घेतल्यानंतर किती एनर्जी सेव्हींग होईल त्या ऐवजी ५ हजार पोलवर हे या पध्दतीने कार्यवाही करून त्यावर महानगरपालिकेस खर्च

लागणार नाही. यातील जे पैसे निघणार आहे ते सेव्हींगमधून निघतील. दर महिण्याला एक्स्ट्रा खर्च नाही. यात असे बघीतले जाईल की जो एक सोडीयम व्हेपर दिवा लावल्यानंतर त्यास ८ ते ९ तासासाठी किती यूनीट वीज लागते. व त्यानूसार किती बील यावयास पाहिजे. या प्रमाणे एव्हरेज काढणार आहे. व त्याप्रमाणे किती एनर्जी सेव्हींग होवू शकते याचा विचार करणार आहोत. पाच हजार फिटींग विकत घेणे व ते लावणे व त्यावर देखभाल दुरूस्ती करणे ऐवजी पाच हजार पोलवर बोओटी पध्दतीने कार्यवाही करणे व देखभाल दुरूस्तीसाठी देणे. व उर्वरीत जे २० हजार पोल आहे त्यावरील देखभाल दुरूस्तीसाठी त्यास प्राव्हेटेशनवर दयायचे त्यावेळी ते किती एजन्सीला दयायचे कि वार्ड वाईज दयायचे हे ठरवू. या व्यतिरिक्त जर कुणी टायमर लावून किंवा बोर्ड लावून एनर्जी सेव्हींग करीत असतील तर त्यानूसार सुध्दा कार्यवाही होवू शकते. पाच हजार पोलवर आज सध्या लाईट बंद आहे. पाच हजार पोलवर कार्यवाही करीत आहेत. जेव्हा एजन्सीची मुदत संपेल तेंव्हा त्याच एजन्सीचे फिटींग घेणे बंधनकारक राहणार नाही. तसेच २४ तासाच्या आत लाईट लावले गेले नाही तर संबधीत एजन्सीवर दंड आकारणी केली जाईल. सर्व विचार करून प्रस्ताव ठेवलेला आहे त्यास मान्यता दयावी अशी विनंती आहे.

श्री.प्रशांत देसरडा :ज्या फिटींग लावण्यात येतील त्यास लागणारा जो लाईट असेल तोच लाईट करार संपल्यानंतर लावावा लागेल काय याचाही खुलासा करावा.

मा.आयुक्त :जरी त्याच कंपनीचा लाईट लावण्याची गरज पडली तर सेव्हींगमधूनच लावणार आहोत. महानगरपालिकेला खर्च करण्याची गरज पडणार नाही. पाच हजार पोलची फिटींग विकत घेण्यासाठी महानगरपालिकेस जास्त खर्च लागणार आहे. प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे एनर्जी सेव्हींग करून ही कार्यवाही करता येईल. महानगरपालिकेला यानूसार कोणताही खर्च आज करावा लागणार नाही.

श्री.नरवडे वसंत :पाच हजार पोलवर लाईट बंद आहे म्हणून सर्वे केलेला आहे असे मा.आयुक्तांनी आताच सांगितलेले आहे. विविध भागात जे पाच हजार पोलवर लाईट बंद आहे त्या पोलवर या प्रमाणे कार्यवाही करणार आहात काय? कुठेतरी एक ठरावीक भागात याप्रमाणे कार्यवाही करावी.

मा.आयुक्त : एका ठराविक भागात ही कार्यवाही करता येईल. तेथे ज्या चालू फिटींग आहे त्या बदलून जेथे बंद आहे तेथे लावता येतील.

श्री.अ.रशिद खान मामु : मकबरा रोड,ज्युब्ली पार्क ते पानचक्की, मा.महापौर,मा.उपमहापौर जे प्रस्तावित करतील त्याचा समावेश करावा.

श्री.त्रिबंक तुपे : मोंढा ते जाफरगेटचा समावेश करावा.

मा.महापौर : फक्त ५००० पर्यंत पोल्ससाठी प्रथम प्रायोगिक तत्वावर करण्यात यावे. यात प्रामुख्याने व्ही.आय.पी. रस्ते जसे, चिकलठाणा ते बाबा पेट्रोलपंप ते नगर नाका वाहतुक बेट व मुख्य रस्ता इ. समावेश करावा. आय.एस.आय. प्रमाणे असावे व महापौरांची मान्यता घेवून करावे.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार प्रस्तावातील अ.क्र.१ ते ११ च्या अटीस अधिन राहून प्रायोगिक तत्वावर फक्त ५००० पोल्स च्या संख्येपर्यंतच ऊर्जा बचतसाठी शहरातील व्ही.आय.पी.व मुख्य रस्त्यावर आणि महापौरांच्या मान्यतेने व आय.एस.आय.स्पेसिफीकेशन प्रमाणे विद्युत उपकरणे वापरून बी.ओ.टी. पध्दतीवर देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**स.सदस्यांचे प्रश्न**

श्री.सलीम पटेल :प्रश्न क्र.२० मध्ये ७ वर मी असा प्रश्न केलेला होता की पद मंजूर/उपलब्ध नसल्यास असा अतिरिक्त कार्यभार देता येते का त्यावर प्रशासनाने असे उत्तर दिले की पद मंजूर /उपलब्ध नसल्यास असा अतिरिक्त कार्यभार देता येत नाही.

मा.महापौर : यात प्रशासनाची नजरचूक झालेली असेल तरी स.सदस्य यांना पद नसल्यास, आहे त्या पध्दतीने उत्तर देण्यात यावे.

श्री.संजय जोशी :प्रश्न क्र २३ मधे जकात विभागातर्फे १० पट दंड आकारण्यात आल्याची किती प्रकरणे करण्यात आलेली आहे असा प्रश्न विचारलेला होता. नंतर उत्तर देण्यात येईल अशी माहिती प्रशासनाने दिलेली आहे.

मा.महापौर : या संदर्भात प्रशासनाने तात्काळ स.सदस्य यांना उत्तर देण्यात यावे तसेच ऐनवेळचे प्रशासकीय व स.सदस्यांचे सर्व प्रस्ताव मंजूर करण्यात येत आहे.

**ऐनवेळचे विषय**

**विषय क्र.१२९/१ :**

अतिरिक्त शहर अभियंता, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, गौतमनगर ते पिसादेवी या रस्त्याचे (मनपा हद्दीपर्यंत) पुन:र्डाबंरीकरण करणे. या कामाकरीता सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन २००४-२००५ च्या दरसूचीनुसार रक्कम रू.२२,५०,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. या कामाचा खर्च २००५-०६ या आर्थिक वर्षात शहर सौंदर्यीकरण या लेखाशिर्षाखाली असलेल्या २ कोटी तरतूदीमधून रू.२२,५०,०००/- पुन:र्डांबरीकरण या लेखाशिर्षात वळती करून करण्याचा दि.२५.१०.२००५ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती बैठकीमध्ये निर्णय झालेला आहे. सदर अंदाजपत्रकास मा.आयुक्त यांनी शिफारस केलेली आहे.

तरी शहर सौंदर्यीकरण या लेखाशिर्षाखाली असलेल्या रक्कम रू.२ कोटी तरतूदीमधून रक्कम रू.२२.५० लक्ष पुन:र्डाबंरीकरण या लेखाशिर्षात वळती करण्यासाठी तसेच २२,५०,०००/- चे अंदाजपत्रकास मान्यता मिळणे करीता प्रस्ताव मान्यतेस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, गौतमनगर ते पिसादेवी या रस्त्याचे (मनपा हद्दीपर्यंत) पुन:र्डाबंरीकरण करणेच्या कामाकरीता, शहर सौंदर्यीकरण या लेखाशिर्षाखाली असलेल्या रक्कम रू.२ कोटी तरतूदीमधून रक्कम रू.२२.५० लक्ष पुन:र्डाबंरीकरण या लेखाशिर्षात वळती करून र.रू.२२,५०,०००/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१३०/२ :**

कार्यकारी अभियंता (पा.पु.) प्रस्ताव सादर करीत आहेत की, एन-८ भागामध्ये महानगरपालिका दवाखान्याच्या मागे १५.०० लक्ष लिटर क्षमतेचा जलकुंभासाठी सिडकोने प्रस्तावित केलेल्या जागेवर या विभागाकडून अंदाजपत्रक रक्कम रू.४०,२२,१००/- चे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचे दरसूची सन २००५-२००६ अन्वये तयार करण्यात आलेले असून सन २००५-२००६ चे अर्थसंकल्पात भांडवली कामे पाणीपुरवठा या लेखाशिर्षकात एकूण रू.१६.०० लाखाची तरतुद ठेवण्यात आलेली आहे. उर्वरीत तरतुद पुढील अर्थसंकल्पात करण्यात येईल. या कामासाठी मा.आयुक्तांची शिफारस झालेली आहे.

तरी एन-८ भागामध्ये १५.०० लाख लिटर क्षमतेचे जलकुंभ बांधण्याचे अंदाजपत्रक रक्कम रू.४०,२२,१००/-चे मंजुरीबाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव तथा विचारास्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, एन-८ भागामध्ये महानगरपालिका दवाखान्याच्या मागे १५.०० लक्ष लिटर क्षमतेचा जलकुंभासाठीच्या र.रू.४०,२२,१००/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१३१/३ :**

मा. सभापाती स्थायी समिती महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मुबंई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०३ च्या तरतुदीस अधिन राहुन. स्थायी समिती सभा दिनांक २७.०९.२००५,०४.१०.२००५, १८.१०.२००५ , २५.१०.२००५, १६.११.२००५, २२.११.२००५, २९.११.२००५ व दि.१५.१२.२००५ रोजी संपन्न झालेल्या सभेत सन २००५-२००६ च्या अर्थसंकल्पात समाविष्ट असलेल्या काही कामांचे लेखाशिर्षात बदल करणेबाबतच्या प्रस्तावास मान्यता प्रदान केलेली असुन सदरील लेखा शिर्ष अतर्गंत बदल करण्यात आलेल्या कामांचे नावे व बदल करण्यात आलेल्या कामांची नावे निम्ननिर्दिष्ट अनुसार सादर करण्यात येत आहे.

स्थायी समिती सभा दि.२७-०९-२००५(कार्यक्रम पत्रिका क्र. १० नुसार)

| वार्ड क्र. | पृष्ठ क्र. -अ.क्र. | **कामाचे नांव व अर्थसंकल्पातील तरतुद** | **नविन/सुधारीत कामाचे नांव व सुधारीत आर्थिक तरतुद** | **रक्कम** |
|---|---|---|---|---|
| ४ | १५०/७० | हर्सुल हनुमान मंदीर ते हरसिध्दी मंदीरापर्यंत रस्त्याचे डांबरीकरण करणे - २.०० लक्ष | एन-१३ भरतनगर येथील तुळजाभवानी व हनुमान मंदीर समोरील खुल्या जागेवर सिमेंट कॉंक्रीट करणे | **२.०० लक्ष** |
| ६ | १४६/२६ | प्रभाग क्र. ६ लालमंडी कोळीवाडा गोगानाथमंदीरासमोरील गल्ली येथे शहाबाद फरशी बसविणे-रू.२.०० लक्ष. | प्रभाग क्र. ६ लालमंडी कोळीवाडा गोगानाथमंदीरासमोरील गल्ली येथे चेकर्ड टाईल्स बसविणे. | **२.०० लक्ष** |
| | १४७/२ | जयसिंगपुरा लालमंडी भागात रस्त्याचे पुनर्डांबरीकरण करणे-रू.२.०० लक्ष. | प्रभाग क्र. ६ मध्ये विविध ठिकाणी विद्युत पथदिवे बसविणे. | **२.०० लक्ष** |
| ७ | १३३/५० | भिमनगर भावसिंगपुरा येथील खुली जागा विकसित करणे-१.५० लक्ष. | वार्ड क्र.७ मधील स्मशानभुमीसाठी रस्ता तयार करणे . | **१.५० लक्ष** |
| ३० | १३६/१० | हर्षनगर, तेलंगवाडा येथील सार्वजनिक शौचालय दुरूस्ती करणे-२ लक्ष | १. वार्ड क्र.३० मध्ये सार्वजनिक शौचालय दुरूस्ती<br>२. वार्ड क्र.३० मध्ये विविध ठिकाणी गटार दुरूस्ती करणे | **०.५०**<br>**१.५० लक्ष** |
| | १२६/२ | हर्षनगर, येथील ड्रेनेज लाईन टाकणे-५ लक्ष | वार्ड क्र.३० मध्ये विविध ठिकाणी ड्रेनेज दुरूस्ती व अपरूटीन करणे | **५.०० लक्ष** |
| ५० | १६८/४ | गुरूरामदासनगर, सुराणानगर येथे मोठ्या व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणे-३.०० लक्ष | लोकमत टाऊन सेंटर सिडको येथे मोठ्या व्यासाची जलवाहिनी टाकणे | **३.०० लक्ष** |
| | १७४/५ | मोतीवालानगर स्मशानमारोती मंदिर ते गांधीनगर पर्यंतची मेन सिव्हर लाईन दुरूस्त करणे -३.३२ लक्ष | सुराणानगर वार्डात खुली जागा विकसित करणे | **३.३२ लक्ष** |
| ९४ | १३२/२५ | बन्सीलालनगर येथील मनपाची खुली जागा विकसित करणे-१० लक्ष | प्रभाग क्र.९४ जालाननगर भागात मनपाच्या खुल्या जागेत जिम्नॅशियम हॉल बांधणे | **१० लक्ष** |
| | १२२/१४ | राहुलनगर भागातील रस्त्यांचे डांबरीकरण करणे -२.५० लक्ष | जालाननगर भागात विविध ठिकाणी खडीकरण करणे | **२.५० लक्ष** |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | १४९/३७ | **लेखाशिर्ष–पुन:र्डाबरीकरण** जहागीरदार कॉलनी व मगरीबी रेखांकन रस्तयाचे पुन:र्डांबरीकरण करणे - १० लक्ष | **लेखाशिर्ष–नवीन खडी रस्ते** जालाननगर व मगरीबी ले-आऊट भागात विविध ठिकाणी खडीकरण करणे व फुटपाथ बांधणे | **१६.०० लक्ष** |
| | १४९/३९ | **लेखाशिर्ष–पुन:र्डाबरीकरण** जालाननगर रस्त्याचे पुन:र्डांबरीकरण व फुटपाथ करणे - ६.०० लक्ष | | |

**स्थायी समिती सभा दि.४–१०–२००५(कार्यक्रम पत्रिका क्र.११ नुसार)**

| वार्ड क्र. | पृष्ठ क्र. -अ.क्र. | **कामाचे नांव व अर्थसंकल्पातील तरतुद** | **नविन/सुधारीत कामाचे नांव व सुधारीत आर्थिक तरतुद** | **रक्कम** |
|---|---|---|---|---|
| २ | १२२/१७ | **देखभाल दुरूस्ती** वार्ड क्र.२ अंतर्गत असलेल्या स्लम विभागातील विविध विकासाची कामे करणे- ११ लक्ष | **भांडवली कामे** वार्ड क्र.२ अंतर्गत असलेल्या स्लम विभागातील विविध विकासाची कामे करणे | **११ लक्ष** |
| ९ | १८४/ १०० | बिल्डर्स सोसा.येथील जुनी अरसीसी लाईन काढून नवीन एसडब्ल्युजी लाईन टाकणे - ३.०० लक्ष | नंदनवन कॉलनीतील मुख्य रस्त्याचे साईड पंख्याचे खडीकरण करणे | **३.०० लक्ष** |
| ६० | १६६/९१ | वार्ड क्र.६० मध्ये नवीन जलवाहिनी टाकणे - ३.५० लक्ष | वार्ड क्र.६० मध्ये नवीन हातपंप (बोअर) बसविणे | **३.५० लक्ष** |
| | १७२/१२ | सिल्लेखाना ते समर्थनगर नवीन ड्रेनेज लाईन टाकणे - ३.०० लक्ष | वार्ड क्र.६० मध्ये विविध ठिकाणी कॉंक्रेटींग करणे | **३.०० लक्ष** |
| ९८ | १४३/५४ | प्रभाग क्र.९८ मधील अभिनंदन सोसायटी, आनंदविहार ते नाथपुरम खडीकरण व डांबरीकरण करणे - रू.४.०० लक्ष-**काम रद्द करणे** | वार्ड क्र.९८ अंतर्गत नक्षत्रवाडी, कांचनवाडी, विटखेडा परिसरात विविध ठिकाणी रस्त्याचे खडीकरण, डांबरीकरण, मजबुतीकरण तसेच पुनर्डांबरीकरण करणे. **(अ.क्र.५४ व ५५ ची एकत्रित तरतुद–४ +१० =१४.०० लक्ष)** | **१४.०० लक्ष** |
| | १४३/५५ | प्रभाग क्र.९८ इटखेडा येथील २४ मीटर विकास योजना रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरण करणे - १०.०० लक्ष- **काम रद्द करणे.** | | |
| ९८ | १९०/४१ | पैठणरोड ते विटखेडा गावापर्यंत विद्युत पथदिवे लावणे - १.०० लक्ष | विटखेडा भागात व परिसरात विविध ठिकाणी मर्क्युरी विद्युत फिटींग लावणे | **१.०० लक्ष** |
| | १९०/६४ | प्रभाग क्र.९८- १००% विकास खर्च भरलेल्या वसाहतीत विद्युत पथदिवे लावणे - ५.०० लक्ष | प्रभाग क्र.९८ मधील कांचनवाडी,विटखेडा, नक्षत्रवाडी(सर्व स्लम) मध्ये तसेच १००% विकास खर्च भरलेल्या सर्व भागात खांबासह विद्युत पथदिवे लावणे व मर्क्युरी फिटींग लावणे | **५.०० लक्ष** |

**स्थायी समिती सभा दि.१८–१०–२००५(कार्यक्रम पत्रिका क्र.१२ नुसार)**

| वार्ड क्र. | पृष्ठ क्र. -अ.क्र. | **कामाचे नांव व अर्थसंकल्पातील तरतुद** | **नविन/सुधारीत कामाचे नांव व सुधारीत आर्थिक तरतुद** | **रक्कम** |
|---|---|---|---|---|
| १३ | १३६ | वार्ड क्र.१३ दिल्लीगेट ते आझाद कॉलेज रोडवर सार्वजनिक शौचालय बांधणे - २.०० लक्ष | वार्ड क्र.१३ गीतानगर येथे मनपा शालेय इमारतीतील विविध विकास कामे करणे | **२.०० लाख** |
| | १२२ | प्रभाग क्र.१३ गीतानगर येथे मुख्य रस्त्याचे डांबरीकरण करणे - ५.०० | वार्ड क्र.१३ गीतानगर मागील वस्तीमध्ये दगडी गटार बांधणे | **५.०० लाख** |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४२ | १५०/७९ | चंपा मस्जीद ते रोशनगे रस्त्याचे डांबरीकरण करणे - ३.०० लक्ष | १. मकसुद कॉ.रोशनगेट भागात मोठ्या व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणे<br>२. मकसुद कॉ.रोशनगेट भागात ट्युबलर पोल्स लावणे | **२.०० लक्ष**<br>**१.०० लक्ष** |
| | १५२/१४ | रोशनगेट येथे वाहतुक बेटाची दुरूस्ती करणे - १.०० लक्ष | रोशनगेट प्रभागातील मुख्य गटारीवरील लोखंडी जाळ्या कॉंक्रेटींग दुरूस्ती करणे | **१.०० लाख** |
| ४७ | १४७/४२ | अति.शहर अभियंता विभाग<br>वॉर्ड क्र.४७ मध्ये विविध भागात कॉंक्रेटींग करणे - ४.०० लक्ष | शहर अभियंता विभाग<br>वॉर्ड क्र.४७ मध्ये विविध भागात कॉंक्रेटींग करणे . | **४.०० लाख** |
| ६२ | १३५/२७ | पोलीस कॉलनी, क्रांतीचौक येथे खेळणी बसविणे - २.५० लक्ष | म्हाडा कॉलनी, पुष्पनगरी येथे पूल बनविणे | **२.५० लाख** |
| | १३३/७२ | वॉर्ड क्र.६२ मध्ये खेळणी बसविणे - ४.०० लक्ष | भाग्यनगर मध्ये फुटपाथ बनविणे | **४.०० लाख** |
| | १३३/६१ | वार्ड क्र.६२ मध्ये लहान मुलांसाठी खेळणी बसविणे - ३.०० लक्ष | औरंगाबाद अशोका हॉटेल नवीन वसाहतीत ड्रेनेज लाईन टाकणे | **३.०० लाख** |
| | १४३/४५ | वॉर्ड क्र.६२ मधील समानगर येथील रस्त्याचे रूंदीकरण करणे-५.००लक्ष | वॉर्ड क्र.६२ मधील पाण्याचे टाकीासून भिमसंदेश चौक या रस्त्याच्या दोन्ही बाजुनी फुटपाथ बनविणे | **५.०० लाख** |
| | १६९/२३ | वॉर्ड क्र.६२ चिंतामण कॉलनी येथे जलवाहिनी बदलणे, नवीन ए.सी.जलवाहिनी टाकणे-२.०० लक्ष | औरंगाबाद अशोका हॉटेल नवीन वसाहतीत नवीन जलवाहिनी टाकणे | **२.०० लाख** |
| | १८३/८१ | शांतीनिकेतन कॉलनी येथील ड्रेनेज लाईन बदलणे - २.०० लक्ष | समतानगर येथील मधुर हॉस्पीलटल ते मेशराम सरांच्या घरार्यंत नवीन ड्रेनेज लाईन टाकणे | **२.०० लाख** |
| | १८७/१५ | वॉर्ड क्र.६२ शिवाजी कॉलनी येथील नाल्यावर पाईप बसविणे-५.०० लक्ष | वॉर्ड क्र.६२ भाग्यनगर मधील डांबरीकरण करणे | **५.०० लाख** |
| ७० | १६६/९६ | वॉर्ड क्र.७० अंतर्गत विविध ठिकाणी जलवाहीनी टाकणे - ३.५० लक्ष | **१.** वार्ड क्र.७० मधील सारंग सोसायटी ते गजानन कॉलनी रस्यावर पूल बांधणे<br>**२.** वॉर्ड क्र.७० विद्यानगर येथे मनपा खुल्या जागेस संरक्षित भिंत बांधणे.<br>**३.** प्रभाग क्र.७० चैतन्यनगर येथे मनपा खुली जागा विकसित करणे | **६.५० लाख**<br>**३.०० लाख**<br>**३.०० लाख** |
| | १८५/११६ | प्रभाग ७० विविध ठिकाणी असलेल्या ड्रेनेज लाईनचे अप्रुटींग करणे - १.०० लक्ष | | |
| | १३५/४५<br>१३५/४६ | **१.** वॉर्ड क्र.७० विद्यानगर येथे मनपा खुल्या जागेस संरक्षित भिंत बांधणे- ४.०० लक्ष (पैकी १ लक्ष रूपये पूलाचे कामासाठी वळती करणे)<br>**२.** प्रभाग क्र.७० चैतन्यनगर येथे मनपा खुली जागा विकसित करणे - ४.०० लक्ष(पैकी १ लक्ष रूपये पूलाचे कामासाठी वळती करणे) | | |
| ९४ | १४९/३९ | **लेखाशिर्ष–पुनर्डांबरीकरण**<br>जालाननगर रस्त्याचे पुनर्डांबरीकरण करणे व फुटपाथ बांधणे-६ लक्ष | **लेखाशिर्ष–नवीन खडी रस्ते**<br>वॉर्ड क्र.९४ बन्सीलालनगर अंतर्गत जालाननगर व मगरबी कॉलनी येथे खडीकरण व फुटपाथ बांधणे | **६.०० लाख** |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | १४२/१४ | **लेखाशिर्ष-नवीन डांबरीकरण**<br>उड्डाण पुलाखालील एसटी वर्कशॉप समोरील रस्याचे डांबरीकरण करणे-५.०० लक्ष | **लेखाशिर्ष-पुनर्डांबरीकरण**<br>वॉर्ड क्र.९४ अंतर्गत जहागिरदार कॉ.व मगरबी ले आऊट, जालाननगर इ.ठिकाणी पुनर्डांबरीकरण करणे | **५.०० लाख** |
| | १४७/५८ | **लेखाशिर्ष-कॉंक्रीट रस्ते**<br>जहागिरदार कॉलनी येथे मजबुतीकरण व फुटपाथ बांधणे - ५.०० लक्ष | **लेखाशिर्ष-पुनर्डांबरीकरण**<br>प्रभाग क्र.९४ अंतर्गत जहागिरदार कॉलनी व मगरबी ले-आऊट, जालाननगर इ.ठिकाणी पुनर्डांबरीकरण करणे | **५.०० लाख** |
| ९५ | १४६/२१ | नयी बस्ती येथे आर.सी.सी.रोड तयार करणे - ३.०० लक्ष | वार्ड क्र.९५ पदमपुरा येथे आरसीसी रोड तयार करणे | **३.०० लाख** |
| ९८ | १४३/५४ | प्रभाग क्र.९८ मधील अभिनंदन सोसायटी, आनंदविहार ते नाथपुरम खडीकरण व डांबरीकरण करणे - रू.४.०० लक्ष-**काम रद्द करणे** | **(अ.क्र.५४ व ५५ ची एकत्रित तरतुद-४ +१० =१४.०० लक्ष)**<br>**१.** वार्ड क्र.९८ अंतर्गत नक्षत्रवाडी, कांचनवाडी, विटखेडा परिसरात विविध ठिकाणी रस्त्याचे खडीकरण, डांबरीकरण, मजबुतीकरण तसेच पुनर्डांबरीकरण करणे.<br>**२.** कांचनवाडी येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याजवळ बहुउद्देशीय हॉल बांधणे | **११.५० लक्ष**<br><br>**२.५० लक्ष** |

**स्थायी समिती सभा दि.२५-१०-२००५(कार्यक्रम पत्रिका क्र.१३ नुसार)**

| वार्ड क्र. | पृष्ठ क्र. -अ.क्र. | **कामाचे नांव व अर्थसंकल्पातील तरतुद** | **नविन/सुधारीत कामाचे नांव व सुधारीत आर्थिक तरतुद** | **रक्कम** |
|---|---|---|---|---|
| ०२ | १५२/१९ | **लेखाशिर्ष- शहर सौंदर्यीकरण**<br>शहर सौंदर्यीकरणाचे विविध कामे करणे - २.०० कोटी मधून २२.५० लक्ष वळती करणे. | १. शहर सौंदर्यीकरणाचे विविध कामे करणे<br>**लेखाशिर्ष - पुनर्डांबरीकरण**<br>२. गौतमनगर ते पिसादेवी रस्त्याचे (मनपा हद्दीपर्यंत)पुनर्डांबरीकरण करणे | **१७७.५० लक्ष**<br>**२२.५० लक्ष** |
| ६ | १३३/५५ | **लेखाशीर्ष-नवीन उद्याने**<br>निपट निरंजन सोसायटी येथील उद्यान विकसित करणे व संरक्षित भिंत बांधणे - २.५० लक्ष | **लेखाशीर्ष-नवीन खडी रस्ते**<br>विद्युत कॉलनी येथील रस्त्यांचे साईड पंख्यांचे खडीकरण करणे | **५.५० लक्ष** |
| | १५०/७२ | **लेखाशीर्ष - पुनर्डांबरीकरण**<br>बेगमपुरा कुंभारगल्ली ते जयसिंगपुरा मस्जीदपर्यंत रस्त्याचे डांबरीकरण करणे- ३.०० लक्ष | | |
| ४२ | १६६/८३ | मकसूद कॉलनी भागात मोठ्या व्यासाची नवीन जलवाहिनी टाकणे - ३.०० लक्ष | मकसूद कॉलनी व आझम कॉलनी भागात जुनी जलवाहिनी बदलून नवीन जलवाहिनी टाकणे | **३.०० लक्ष** |
| ६४ | १५०/८९ | **लेखाशिर्ष-पुनर्डांबरीकरण**<br>अबोली अपार्ट. ते उत्सव मंगल कार्यालय ते पन्नालालनगरकडील रस्त्याचे डांबरीकरण करणे -३ लक्ष | **लेखाशिर्ष-नवीन खडी रस्ते**<br>अबोली अपार्ट. ते उत्सव मंगल कार्यालय ते पन्नालालनगरकडील रस्त्याचे खडीकरण करणे | **३.०० लक्ष** |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | १५०/९० | **लेखाशिर्ष–पुनर्डांबरीकरण** उस्मानपुरा सर्विस लाईन रस्त्याचे डांबरीकरण करणे - ४.०० लक्ष | **लेखाशिर्ष–नवीन कॉंक्रीट रस्ते** उस्मानुरा सर्विस लाईन रस्त्यावर पेव्हींग सिमेंट ब्लॉक बसविणे | **४.०० लक्ष** |
| ७६ | १६४/३१ | रामनगर प्रभागात पाणी पुरवठ्याची किरकोळ कामे करणे | भाग क्र.७६ मधील खुल्या जागेत पेव्हर ब्लॉक बसविणे | **२.०० लक्ष** |
| | १६४/३२ | प्रभाग क्र.७६ रामनगर प्रभागातील अंतर्गत जलवाहिनी बदलणे | वॉर्ड क्र.७६ रामनगर अंतर्गत खुल्या जागेत पेव्हर ब्लॉक बसविणे | **२.०० लक्ष** |
| | १६४/३३ | रामनगर प्रभागात अंर्गत जलवाहिनी बदलणे | रामनगर प्रभागात विविध ठिकाणी पेव्हर ब्लॉक बसविणे | **२.५० लक्ष** |
| ८० | - | प्रभाग क्र.८० मधील सार्वजनिक शौचालय दुरूस्ती करणे-२ लक्ष | वार्ड क्र.८० मध्ये आरोग्य केंद्र बांधणे | **२.०० लक्ष** |

**स्थायी समिती सभा दि.१६-११-२००५(कार्यक्रम पत्रिका क्र.१४नुसार)**

| वार्ड क्र. | पृष्ठ क्र. -अ.क्र. | **कामाचे नांव व अर्थसंकल्पातील तरतुद** | **नविन/सुधारीत कामाचे नांव व सुधारीत आर्थिक तरतुद** | **रक्कम** |
|---|---|---|---|---|
| **८** | १२६/६ | स्लम भागात ड्रेनेज लाईन टाकणे-४.०० लक्ष | वॉर्ड क्र.८ मध्ये विविध ठिकाणी स्ट्रीट लाईट, फिक्चर, विद्युत खांब बसविणे | **४.००** लक्ष |
| **१३** | १४६ | वॉर्ड क्र.१३ सुभेदारी गेस्ट हाऊस मागील वसाहतीत कॉंक्रेटींग करणे-२.०० लक्ष | वॉर्ड क्र.१३ मध्ये विविध ठिकाणी जीआय पोल, ७० वॅट व २५० वॅट सोडीयम फिटींग लावणे | **२.००** लक्ष |
| **२८** | १४६/१३ | नेहरूनगर डीपी रोड लगतच्या गल्लीत कॉंक्रेटींग करणे - १.०० लक्ष | सदफ कॉलनी कटकट गेट येथे कॉंक्रेटींग करणे | **१.००** लक्ष |
| **२८** | १८५/१७ | खाजा कॉलनी ते एस.टी.कॉलनी पर्यंत गटार बांधणे - **५.००** लक्ष | वॉर्ड क्र.२८ मध्ये जी.आय.पोल बसविणे | **२.००** लक्ष |
| | | | वॉर्ड क्र.२८ मध्ये विविध ठिकाणी कॉंक्रेटींग करणे | **३.००** लक्ष |
| **४३** | १८६/६ | **१.** शरीफ कॉलनी येथील नाल्यातील चोकअप झालेली सिव्हर लाईनची दुरूस्ती करणे - **५.००** लक्ष | (अ.क्र.१+२ ची एकत्रित तरतुद **रू.८.०० लक्ष** मधून खालील कामे प्रस्तावित करण्यात येत आहेत.) | |
| | **१५१/१११** | **२.** रोशनगेट ते शरीफ कॉलनी दर्गापर्यंत रस्त्याचे पुनर्डांबरीकरण करणे-**३.००** लक्ष | १) अरफात मस्जीद कब्रस्तानची भिंतीची उंची वाढविणे व गेट बसविणे<br>२) वॉर्ड क्र.४३ मधील विविध ठिकाणी फरशी दुरूस्ती व कॉंक्रेटींग करणे<br>३) वार्ड क्र.४३ मध्ये टयुबलर पोल लावणे<br>४) वॉर्ड क्र.४३ मध्ये विविध ठिकाणी सोडीयम व्हेपर दिवे लावणे | **२.००** लक्ष<br>**१.००** लक्ष<br>**३.००** लक्ष<br>**२.००** लक्ष |
| **४५** | १२५/ ११-२ | नवीन डांबरीकरण-किराडपुरा प्रभाग क्र.४३,४४,४५ येथे डांबरीकरण करणे - **५.००** लक्ष | वॉर्ड क्र.४५ मध्ये हत्तेसिंगपुरा पाण्याच्या टाकीजवळील भागात खडीकरण व नुतनीकरण करणे | **५.००** लक्ष |
| **४८** | १४६/१२ | शुभश्री कॉलनी, साईनगर, अविष्कार कॉलनी येथे सिमेंट कॉंक्रीट रस्ते बनविणे - १०.०० लक्ष | वॉर्ड क्र.४८ मधील खुल्या जागांचे कॉंक्रेटींग करणे | **१०.००** लक्ष |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ८९ | १३५/३३ | ज्योतीनगर खुली जागा विकसित करणे व भिंत बांधणे - १.५० लक्ष | प्रभाग क्र.८९ येथे विविध ठिकाणी पथदिवे बसविणे | **१.५०** लक्ष |
| | १३५/३६ | प्रतापनगर येथे खुल्या जागेत उद्यान विकसित करणे - २.५० लक्ष | वॉर्ड क्र.८९ मधील उद्यानांची किरकोळ दुरूस्ती करणे | **२.५०** लक्ष |
| | १४९/५४ | प्रतापनगर येथील रस्त्यांचे पुनर्डांबरीकरण करणे - ५.०० लक्ष | ज्योतीनगर येथील रस्त्यांचे पुनर्डांबरीकरण करणे | **५.००** लक्ष |
| | १६७/१११ | दशमेशनगर व प्रशांतनगर येथे जलवाहिनी टाकणे - ३.०० लक्ष | वॉर्ड क्रमांक ८९ मधील एस. बी. एच. कॉलनी येथे पुनर्डांबरीकरण करणे | **३.००** लक्ष |
| | १६९/१४ | दशमेशनगर शांताराम काळे यांच्या घराजवळ १५० मीमी व्यासाची जलवाहिनी दुरूस्ती करणे-२५ हजार | विठ्ठल मंदीर ज्योतीनगर येथे थ्री सेट लावणे | **२५** हजार |

**स्थायी समिती सभा दि.२२-११-२००५(कार्यक्रम पत्रिका क्र.१५)**

| वार्ड क्र. | पृष्ठ क्र. -अ.क्र. | **कामाचे नांव व अर्थसंकल्पातील तरतुद** | **नविन/सुधारीत कामाचे नांव व सुधारीत आर्थिक तरतुद** | **रक्कम** |
|---|---|---|---|---|
| १० | १७३/२७ | **स्पील ओव्हर मधील काम** भीमनगर भावसिंगपुरा (श्रावस्तीनगर)येथे ड्रेनेज लाईन टाकणे - स्पील र. रू.३.४३ लक्ष | १. भीमनगर भावसिंगपुरा येथील मनपा शाळेमागील दवाखाना इमारतीतील उर्वरीत कामे करणे | **१.४३ लक्ष** |
| | | | २. भीमनगर भावसिंगपुरा वॉर्डात विद्युत पथदिवे बसविणे | **२.०० लक्ष** |
| ४२ | १८३/७६ | १. वॉर्ड क्र.४२ मध्ये गटारी दुरूस्ती करून आरसीसी ढापे टाकणे-३ लक्ष | (क्र.१ व २ च्या कामाची एकत्रित रक्कम रू.६.०० लक्ष) म्हाडा कॉलनी ते रविंद्रनगर येथील नाल्यावर संरक्षित भिंत बांधून आर.सी.सी.स्लॅब टाकणे | **६.०० लक्ष** |
| | १८६ ४/८ | २. करीम कॉलनी ते मकसुद कॉलनी मेन सिव्हरल लाईन टाकणे - ३ लक्ष | | |
| ४३ | १८६ ४/३ | एस.टी.कॉलनी कटकटगेट इकरा शाळेजवळील सिव्हरलाईन दुरूस्त करणे-२.०० लक्ष | नेहरूनगर प्रभागात ट्युबलर पोल बसविणे | **२.०० लक्ष** |
| ६९ | १३५/२९ | पोलीस लोकमित्र कॉलनी येथील मनपाच्या मोकळ्या जागेस संरक्षित भिंत बांधणे.-२.५० लक्ष | **पुन:डांबरीकरण** पोलीस लोकमित्र कॉलनी व उल्कानगरी यांना जोडणाऱ्या दोन्ही रस्त्यांचे वॉल टू वॉल पुन:डांबरीकरण करणे | **४.५० लक्ष** |
| | १६९/१५ | **पा.पु.देखभाल दुरूस्ती** जवाहर कॉ.भागात जुन्या जलवाहिन्या बंद करून नवीन टाकणे -२.०० लक्ष | | |
| ७८ | १२४/३ | अठरा खेडी विकास कार्यक्रम चिकलठाणा येथे डांबरी रस्ते व पुन:डांबरीकरण करणे.-४.०० लक्ष | नवीन कॉंक्रीट रस्ते(अ.श.अ.विभाग) हनुमान चौक ते मनपा दवाखान्यापर्यंत कॉंक्रेटींग करणेसाठी अतिरिक्त तरतुद. | **४.०० लक्ष** |
| | १७९/३८ | वॉर्ड क्र.७८ मध्ये विविध ठिकाणी नवीन ड्रेनेज लाईन टाकणे-४ लक्ष | नवीन कॉंक्रीट रस्ते(अ.श.अ.विभाग) आंबेडकर चौक ते अहिल्याबाई चौकापर्यंत रस्त्याचे कॉंक्रेटींग करणेसाठी अतिरिक्त तरतुद | **४.०० लक्ष** |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ८४ | १३४/१ | गारखेडा स.नं.५२, ५३ व ५१ मधील मनपाच्या जागेस संरक्षित भिंत बांधणे - ४.०० लक्ष | नाथ प्रांगण येथील मनपाची खुली जागा विकसित करणे | **४.०० लक्ष** |

**स्थायी समिती सभा दि.२९-११-२००५(कार्यक्रम पत्रिका क्र.१६)**

| वार्ड क्र. | पृष्ठ क्र. -अ.क्र. | **कामाचे नांव व अर्थसंकल्पातील तरतुद** | **नविन/सुधारीत कामाचे नांव व सुधारीत आर्थिक तरतुद** | **रक्कम** |
|---|---|---|---|---|
| १ | १२ | वॉर्ड क्र.१ हर्सुल फुलेनगर परिसरात डांबरीकरण करणे - **६.००** मधून (१.५० लक्ष ड्रेनेजच्या कामासाठी वळती करणे.) | **१.** वार्ड क्र.१ मधील गायकवाड सोसायटी येथे ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामासाठी अतिरिक्त तरतुद-१.५० लक्ष<br>**२.** वॉर्ड क्र.१ हर्सुल फुलेनगर परिसरात डांबरीकरण करणे | **१.५० लक्ष**<br>**४.५० लक्ष** |
| ५ | १७२/९ | सलीम मौला, मकबरा रोड यांचे घरापासून स्मशानभूमीपर्यंत ड्रेनेज लाईन टाकणे - ३.०० लक्ष | वार्ड क्र.५ अंतर्गत विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन टाकणे | **३.०० लक्ष** |
| | १८८/६ | आसाराम बापु आश्रम रोडवरील पथदिवे बसविणे - १.०० लक्ष | वार्ड क्र.५ मध्ये विविध ठिकाणी पथदिवे बसविणे | **१.०० लक्ष** |
| ८ | १६७/ १२७ | वॉर्ड क्र.८ मधील मिटमिटा व पडेगांव मध्ये पाण्याची मोठी टाकी बांधणे-५.०० लक्ष | वॉर्ड क्र.८ मध्ये विविध ठिकाणी हातपंप (बोरींग)बसविणे | **५.०० लक्ष** |
| | ११६/४ | **<u>लेखाशीर्ष-अठरा खेडी विकास कार्यक्रम</u>**<br>पडेगांव येथे रस्त्याचे पुनर्डांबरीकरण करणे - ४.७२ लक्ष | **<u>लेखाशीर्ष-भांडवली कामे पाणी पुरवठा</u>**<br>वॉर्ड क्र.८ मध्ये विविध ठिकाणी जलवाहिनी टाकणे | **४.७२ लक्ष** |
| | ११६/३ | **<u>लेखाशीर्ष-अठरा खेडी विकास कार्यक्रम</u>**<br>मिटमिटा येथे रस्त्याचे पुनर्डांबरीकरण करणे - ४.८४ लक्ष | **<u>लेखाशीर्ष-नवीन पथदिवे व्यवस्था</u>**<br>वॉर्ड क्र.८ मध्ये विविध ठिकाणी विद्युतीकरणाची कामे करणे | **४.८४ लक्ष** |
| २६ | १७८/१३ | **<u>भांडवली कामे जलनि:सारण</u>**<br>वॉर्ड २६ नवीन ड्रेनेज लाईन टाकणे, जुन्या ड्रेनेज लाईनची दुरूस्ती करणे व सेप्टीक टँक बंद करणे - १० लक्ष (मधून र.रू.१.०० लक्ष वळती करणे) | १) वॉर्ड २६ नवीन ड्रेनेज लाईन टाकणे, जुन्या ड्रेनेज लाईनची दुरूस्ती करणे व सेप्टीक टँक बंद करणे<br>२) वॉर्ड क्र.२६ मध्ये विद्युत देखभाल दुरूस्तीची कामे करणे | **९.०० लक्ष**<br>**१.०० लक्ष** |
| ३५ | १८७/३<br>१८७/१० | १)गरमपाणी येथील नाल्यावर संरक्षीत भिंत बांधणे- ८.०० लक्ष<br>२) मोगलपुरा नाल्यास संरक्षित भिंत बांधणे - ७.०० लक्ष(काम रद्द करून) | (अ.क्र.१ व २ ची एकत्रित तरतुद) गरमपाणी येथील नाल्यावर संरक्षित भिंत बांधणे | **१५.०० लक्ष** |
| ३८ | १४०/२१ | अंगुरीबाग येथील अंतर्गत रस्ते पुनर्डाबरीकरण करणे - २.५२ लक्ष | बंजारा कॉलनी महाराणा प्रताप शाळेतील गल्लीमध्यें डांबरीकरण करणे | **२.५२ लक्ष** |
| ५५ | १८६/२४ | **<u>लेखाशीर्ष-शहरी भागात खुल्या गटारी बांधणे</u>**<br>प्रभाग क्र.५५ ग.क्र.३ ते ग.क्र.४ हब्बुभाई यांच्या घरापासून चंपाचौकपर्यंत गटार बांधणे -६ लक्ष **मधून झालेली बचत-रू.३.००** लक्ष-कॉंक्रेटींगसाठी वळती करणे | **<u>लेखाशीर्ष-नवीन कॉंक्रीट रस्ते</u>**<br>पृष्ठ क्र.१४७ अ.क्र.४७ - प्रभाग क्र.५५ कैसर कॉलनी येथे विविध ठिकाणी कॉंक्रेटींग करणे - **३.०० +** गटारीचे कामातून झालेली बचत **३.००** लक्ष वळती करणे.(**एकूण ६ लक्ष**) | **६.०० लक्ष** |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ७४ | १४७/५४ | १) संजयनगरमधील ग.नं.९ ते १२ मधील छोट्या गल्लीत फरशी बसविणे - २.०० लक्ष | (क्र.१ व २ ची कामे रद्द करून त्यासाठीची एकत्रित र.रू.४.०० लक्ष पान क्र.१८६ अ.क्र.२९वरील कामासाठी वळती करणे)<br>संजयनगरच्या संरक्षण भिंतीपासून विमानतळापर्यंत संजयनगरचे सांडपाणी काढण्यासाठील मोठा नाला भूमिगत गटार बांधणे.(**६लक्ष+४ लक्ष=१० लक्ष)** | **१०.०० लक्ष** |
| | | २) रोहीदासनगर गल्ली नं.१ व २ मधील लहान गल्लीत फरशी बसविणे - २.०० लक्ष | | |
| ८६ | १४५/४० | बजरंग नगर येथे खडीकरण करणे - २.०० लक्ष | वॉर्ड क्र.८६ मध्ये नवीन विद्युत पोल लावणे | **२.०० लक्ष** |

**स्थायी समिती सभा दि.१५-१२-२००५ (कार्यक्रम पत्रिका क्र.१७ नुसार)**

| वार्ड क्र. | पृष्ठ क्र. -अ.क्र. | **कामाचे नांव व अर्थसंकल्पातील तरतुद** | **नविन/सुधारीत कामाचे नांव व सुधारीत आर्थिक तरतुद** | **रक्कम** |
|---|---|---|---|---|
| १ | | पाणी पुरवठा- हर्सुल तलावास संरक्षिमत भिंत तार कंपौंड बांधणे - १० लक्ष | हर्सुल मधील मनपा क्वॉर्टर जवळील जागेत समाजमंदिर बांधणे | **१०.०० लक्ष** |
| | | चेतनानगर म्हाडा कॉलनी मनपा नविन वसाहत येथे ड्रेनेज लाईन दुरूस्त करणे -४.०० लक्ष | फुलेनगर आईच्या जागेकडे जाणाऱ्या रस्त्यावर पुल बांधणे | **४.०० लक्ष** |
| ५ | १७९/४९ | प्रभाग क्र.५ सुगंध स.गृ.नि.संस्थ नविन ड्रेनेज लाईन टाकणे-३ लक्ष | आरेफ कॉलनी व दिलरस कॉलनी येथे नवीन ड्रेनेज लाईन टाकणे | **३.०० लक्ष** |
| | | प्रभाग क्र.५ साईनगर येथे नवीन ड्रेनेज ाईन टाकणे-२.०० लक्ष | पहाडसिंगपुरा येथे नवीन पोलवर सोडीयम फिटींग बसविणे | **२.०० लक्ष** |
| १३ | १६३ | रोजेबाग ते दिल्लीगेट येथे ३५० मीमी व्यासाची जलवाहिनी टाकणे - ५.०० लक्ष | हनुमान मंदिर ते हर्षनगर चौक पर्यंत पोलसह पथदिवे बसविणे व विविध ठिकाणी ७०, २५० वॅट टयुबलर लावणे | **५.०० लक्ष** |
| १४ | १२६/१८ | सिध्दार्थनगर मधील लहान रस्त्यांना सिमेंट कॉंक्रीट करणे - ३.०० लक्ष | रोजाबाग येथे सिमेंट कॉंक्रीट करणे | **३.०० लक्ष** |
| १९ | १८४/१०२ | **जलनि:सारण देखभाल दुरूस्ती**<br>प्रभाग क्र.१९ म्हाडा वसाहत येथे टाकण्यात आलेल्या ड्रेनेज वाहिनीचे अप्रुटींग करणे-१.०० लक्ष | सिडको म्हाडा कॉलनी एन-९ आर-२६ मधील मनपाच्या खुल्या जागेत संरक्षित भिंत बांधणे व विकसित करणे | **६.०० लक्ष** |
| | १३७ | **भांडवली कामे पाणी पुरवठा**<br>प्रभाग क्र.१९ मधील अंतर्गत जलवाहिनी टाकणे - ५.०० लक्ष | | |
| २४ | १६५/७२ | **भांडवली कामे पाणी पुरवठा**<br>वॉर्ड क्र.२४ मध्ये विविध ठिकाणी जलवाहिनी टाकणे - ४.०० लक्ष | १. वॉर्ड क्र.२४ मध्ये विविध ठिकाणी जलवाहिनी टाकणे.<br>२. वॉर्ड क्र.२४ मध्ये विविध ठिकाणी विद्युत पथदिवे लावणे व दुरूस्ती करणे | **२.०० लक्ष**<br>**२.०० लक्ष** |
| २६ | १६४/३९ | गणेशनगर मध्ये विविध ठिकाणी जलवाहिनी टाकणे - २.५० लक्ष | वॉर्ड क्र.२६ मधील महाराणा प्रताप सोसायटी येथे जलवाहिनी टाकणे | **२.५० लक्ष** |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २९ | १२३/१५ | प्रभाग क्र.२९ महापालिका जुनी इमारतीतील बॅडमिंटन हॉलचे नुतनीकरण करणे - ३ लक्ष | महानगरपालिका सभागृहात वाढ करणे | **३.०० लक्ष** |
| ३० | १७८/१७ | फाजलपुरा येथे ड्रेनेज नवीन लाईन टाकणे - ३ लक्ष | काचीवाडा प्रगतनगर येथे रस्त्याचे डांबरीकरण करणे | **३.०० लक्ष** |
| | १३६/१४ | प्रभाग क्र.३० मध्ये सुलभ शौचालय बांधणे - ५ लक्ष | फाजलपुरा येथील चुन्नीलाल काची यांचे घराजवळील दगडी पुलापासून मुख्य पुल व माळीवाडा ते फाजलपुरा संरक्षित भिंत बांधणे | **५.०० लक्ष** |
| ७ | १६७/ १२० | **भांडवली कामे पाणी पुरवठा**<br>पैठणगेट प्रभागात विविध ठिकाणी नवीन जलवाहिनी टाकणे-१० लक्ष | **१.** पैठणगेट प्रभागात विविध ठिकाणी नवीन जलवाहिनी टाकणे<br>**२.** वॉर्ड क्र.३७ स्वातंत्र्य सैनिक कॉलनी मंजूर रेखांकनामध्ये उद्यान विकसित करणे व पेव्हर ब्लॉक बसविणे, खेळणी बसविणे<br>**३.** प्रभाग क्र.३७ मधील गल्ल्यात रस्त्याचे कॉंक्रेटींग करणे | **३.०० लक्ष**<br>**३.०० लक्ष**<br>**४.०० लक्ष** |
| ४० | १२९/३२ | वॉर्ड क्र४० गवळीपुरा कब्रस्तान विकसित करणे- ५० हजार | निजामोद्यीन कब्रस्तान विकसित करणे | **१.५० लक्ष** |
| | १३५/२२ | वॉर्ड क्र.४०रेंगटीपुरा मनपा खुली जागा विकसित करणे - १.०० लक्ष | | |
| ४१ | १७३/३० | शहाबाजार ते काचिवाडा भागात ३०० मी.मी.व्यासाची लाईन टाकणे- ७.६२ लक्ष (**यातील रू.६ लक्ष बचत झाल्याचे नमुद केले आहे.**) | झालेल्या रू.६.०० लक्ष बचतीच्या रक्कमेतून खालील कामे करावीत.<br>१. शहाबाजार काचीवाडा रसोई घरच्या मागे खूल्या जागेत बालवाडी बांधणे<br>२. वॉर्ड क्र.४१ शहाबाजारमध्ये विविध ठिकाणी पथदिवे दुरूस्ती करणे<br>३. वॉर्ड क्र.४१ मध्ये चंपा ते चेलीपुरा पर्यंत डांबरी रस्ता पॅचवर्क करणे | **२.०० लक्ष**<br>**२.०० लक्ष**<br>**२.०० लक्ष** |
| ९४ | १२५/१३ | प्रभाग क्र.९४ राहुलनगर भागात कॉंक्रिट रस्ते तयार करणे व दुरूस्ती करणे-रू.५५ हजार | जहागिरदार कॉलनी येथील गल्ल्यामध्ये कॉंक्रेटींग करणे | **०.५५ लक्ष** |
| | १५२/१३ | राहुलनगर डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याचे सुशोभिकरण करणे-२.०० लक्ष | राहुलनगर भागात विद्यापीठ प्रवेशद्वाराची प्रतिकृती कमान उभारणे | **२.०० लक्ष** |

उपरोक्त नुसार स्थायी समिती सभेत वेळोवेळी केलेल्या लेखाशिर्ष बदल प्रस्ताव अंदाजपत्रकासह मान्यतेस्तव सादर.

सूचक : श्री.काशिनाथ कोकाटे अनुमोदक : श्री.रेणुकादास वैद्य

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०३ च्या तरतूदीस अधिन राहून स्थायी समिती सभा दि.२७.९.२००५, ४.१०.२००५, १८.१०.२००५,

२५.१०.२००५, १६.११.२००५, २२.११.२००५,२९.११.२००५ व १५.१२.२००५ रोजी संपन्न झालेल्या सभेत सन २००५-२००६ च्या अर्थसंकल्पात समाविष्ट असलेल्या काही कामांचे लेखाशिर्षात बदल करणेस स्थायी समितीने मान्यता दिल्यानुसार वेळोवेळी केलेल्या लेखाशिर्ष बदलास अंदाजपत्रकासह सर्वानुमते मंजुरी देण्यात येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १३२/४ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, शंभु महादेवनगर (प्र.क्र.८९) मधिल खूल्या जागेत पाथवे व सुशोभिकरणासाठी रू.०३.०० लक्ष तरतूद करण्यात आलेली आहे. त्यापैकी र.रू.५०,०००/- ज्योतीनगरमधिल उद्यान विकसित करण्याकरीता वापरण्यात यावी, करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सूचक : सौ.विजया रहाटकर अनुमोदक : सौ.दिपाली पाटील

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शंभु महादेवनगर प्र.क्र.८९ मधिल खूल्या जागेत पाथवे व सुशोभिकरण साठी ठेवण्यात आलेल्या र.रू.३.०० लक्ष तरतूदीमधून रू.५०,०००/-ज्योतीनगरमधिल उद्यान विकसित करण्याच्या कामाकरीता वापरण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते,वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १३३/५ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, माझ्या प्रभागातील खालील कामाकरीता सन २००५-०६ अर्थसंकल्पात असलेल्या निधीवर नमुद केलेल्याप्रमाणे गौतमनगर येथे समाजमंदिर बांधणे व परिसर सुशोभीकरणकरीता वापरण्यात यावा व लेखाशीर्ष बदलण्यास मान्यता देवून काम करण्याबाबत कृपया निर्देश द्यावेत, ही विनंती.

१. प्रभाग५९ अभिनय टॉकिज ते लक्ष्मणचावडी पर्यंत साईड कॉंक्रेटींग करणे- पान क्र.१४७ अ.क्र.५०

२. जाफरगेट आठवडी बाजार भिंत बांधून सुशोभिकरण- पान क्र.१३७ अ.क्र.३१(१)

३. प्रभाग क्र.५९ मनपाच्या विविध शाळांना रंगरंगोटी करणे.- पान क्र.१२४ अ.क्र.१४

सूचक : श्री.सतिष कटकटे अनुमोदक : १.श्री.संतोष खेंडके, श्री.रवि गांगे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, १.प्रभाग क्र.५९ अभिनय टॉकिज ते लक्ष्मणचावडी पर्यंत साईड कॉंक्रेटींग करणे- पान क्र.१४७ अ.क्र.५०, २.जाफरगेट आठवडी बाजार भिंत बांधून सुशोभिकरण- पान क्र.१३७ अ.क्र.३१(१), ३.प्रभाग क्र.५९ मनपाच्या विविध शाळांना रंगरंगोटी करणे.- पान क्र.१२४ अ.क्र.१४ साठी सन २००५-०६ मध्ये ठेवण्यांत आलेल्या तरतूदीचे लेखाशिर्ष बदलून त्याऐवजी वार्ड क्र.५९ मध्ये गौतमनगर येथे समाजमंदिर बांधणे व परिसर सुशोभीकरण करणे या कामासाठी वापरण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १३४/६ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, सन २००५-०६ या अर्थसंकल्पामध्ये भांडवली कामे या लेखाशिर्षका अंतर्गत पा.क्र.६४ अ.क्र.४० आयोध्यानगर जी सेक्टर अंतर्गत जलवाहीनी टाकण्याची तरतुद आहे. परंतु एन-७/सी-२ या सेक्टरमध्ये पाणीपुरवठा व्यवस्थीत होत नसल्याने तेथे जलवाहीनी टाकणे आवश्यक आहे.

करीता आयोध्यानगर जी सेक्टर ऐवजी एन-७/सी-२ येथे जलवाहीनी टाकणे अशी नावासह दुरूस्ती करणे आवश्यक आहे. जेणे करून एन-७/सी-२ येथील जलवाहीनी टाकणे शक्य होईल. सदर प्रस्ताव सर्वानुमते विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

सूचक : सौ.विमल बेंद्रे, सौ.विजया रहाटकर अनुमोदक : श्री.भगवान घडमोडे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सन २००५-०६ या अर्थसंकल्पामध्ये भांडवली कामे या लेखाशिर्षका अंतर्गत पा.क्र.६४ अ.क्र.४० आयोध्यानगर जी सेक्टर अंतर्गत जलवाहीनी टाकण्याच्या तरतूदी ऐवजी

एन-७/सी-२ या सेक्टरमध्ये जलवाहीनी टाकणे असे लेखाशिर्ष बदलणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १३५/७ :**

मराठवाडा साहित्य परिषद व मत्स्योदरी शिक्षण संस्था, जालना ह्यांच्या संयुक्त विद्यमाने ७ व ८ जानेवारी रोजी जालना येथे २७ वे मराठवाडा साहित्य संमेलन होत आहे.

मराठवाड्याला साहित्याची सशक्त परंपरा आहे. संत साहित्याची परंपरा आहे. ग्रामीण साहित्याची परंपरा आहे. मराठवाड्यातील साहित्य चळवळ म्हणजे या देशाचा सांस्कृतिक वारसा आहे. ही चळवळ अशीच सुरू राहावी म्हणून साहित्य संमेलनांची गरज आहे. औरंगाबाद शहर मराठवाड्याच्या राजधानीचे शहर आहे. आपली महानगरपालिका या राजधानीची महानगरपालिका आहे. त्यामुळे या संमेलनाला आर्थिक मदत करणे हे आपले कर्तव्यच आहे.

या संमेलनाच्या निमित्ताने स्मरणिका काढण्यात येणार आहे. या स्मरणिकेत आपण जाहिरातीच्या माध्यमातून मदत करावी अशी विनंती आयोजकांनी केली आहे. तेव्हा स्मरणिकेसाठी र.रू.१,००,०००/- (रूपये एक लाख) ची जाहिरात देण्यात यावी व त्याचा धनादेश 'स्वागताध्यक्ष, २७ वे मराठवाडा साहित्य संमेलन, जालना' या नांवाने काढण्यात यावा. करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सूचक : काशीनाथ कोकाटे, गजानन बारवाल अनुमोदक : श्री.भगवान घडमोडे, रेणुकादास वैद्य

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मराठवाडा साहित्य परिषद व मत्स्योदरी शिक्षण संस्था, जालना ह्यांच्या संयुक्त विद्यमाने ७ व ८ जानेवारी रोजी जालना येथे संपन्न होत असलेल्या २७ व्या मराठवाडा साहित्य संमेलना निमित्ताने काढण्यात येणाऱ्या स्मरणिकेसाठी र.रू.१,००,०००/- (एक लाख) ची जाहिरात देण्यास तसेच त्याचा धनादेश **'स्वागताध्यक्ष, २७ वे मराठवाडा साहित्य संमेलन, जालना'** या नांवाने काढण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १३६/८ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.२४ मध्ये विविध ठिकाणी जलवाहीनी टाकणे यासाठी अर्थसंकल्प २००५-०६ मध्ये ४ लाखाची तरतूद करण्यात आलेली आहे. (पान क्र.१६५ व अ.क्र.७२) त्यातील २ लक्ष रूपये वार्ड क्र.२४ मध्ये जलवाहिनी टाकणे व २ लक्ष रूपये वार्ड क्र.२४ मध्ये विविध ठिकाणी विद्युत पथदिवे लावणे व दुरूस्ती करणे यासाठी असे प्रस्ताव स्थायी समितीच्या १५.१२.०५ च्या बैठकीत केलेले होते.

त्यातील वार्ड क्र.२४ मध्ये जलवाहीनी बदलणे यासाठी २ लक्ष रूपये असा एक प्रस्ताव होता. या प्रस्तावात खालीलप्रमाणे दुरूस्ती करावी, ही विनंती.

०१. १ लक्ष रूपये वार्ड क्र.२४ मध्ये जलवाहीनी बदलणे.

०२. १ लक्ष रूपये वार्ड क्र.२४ अंतर्गत पावरलुम मधील रस्त्याचे कॉक्रीटीकरण करणे.

कृपया वरिल प्रस्तावाचा लेखाशिर्षक बदलण्यात यावा, हि विनंती.

सूचक : सौ.दिपाली सुनिल पाटील अनुमोदक : श्री.संजय शिरसाट

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.२४ मध्ये विविध ठिकाणी जलवाहीनी टाकणे यासाठी अर्थसंकल्प २००५-०६ पान क्र.१६५ अ.क्र.७२ मध्ये करण्यांत आलेली र.रू.४.०० लाखाच्या तरतूदीमधून र.रू.२.०० लक्ष वॉर्ड क्र.२४ मध्ये विविध ठिकाणी विद्युत पथदिवे लावणे व दुरूस्ती करणे यासाठी व र.रू.२.०० लक्ष वॉर्ड क्र.२४ मध्येच खालील कामांसाठी वापरण्यास व लेखाशिर्ष बदलणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

०१. १ लक्ष रूपये वार्ड क्र.२४ मध्ये जलवाहीनी बदलणे.

०२. १ लक्ष रूपये वार्ड क्र.२४ अंतर्गत पावरलुम मधील रस्त्याचे कॉक्रीटीकरण करणे.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १३७/९ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वॉर्ड क्र.३६ नागेश्वरवाडी मधील ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामासाठी असणारी रू.३ लक्षची तरतूद याच वॉर्डातील काब्रा उद्यानाच्या संरक्षित भिंतीची उंची वाढविण्याकरीता वळती करण्याच्या मंजुरीस्तव प्रस्ताव सादर.

| वॉर्ड क्र. | पृष्ठ क्र./ अ.क्र. | कामाचे नांव व अंदाजपत्रकीय तरतूद | सुधारीत कामाचे नांव व अंदाजपत्रकीय तरतूद |
|---|---|---|---|
| ३६ | १७८/२० | भांडवली कामे जलनि:सारण<br>वॉर्ड क्र.३६ मधील ड्रेनेज लाईन्स बदलून नविन ड्रेनेज लाईन टाकणे-३.०० लक्ष | वॉर्ड क्र.३६ मधील काब्रा उद्यानाच्या संरक्षित भिंतीची उंची वाढविणे ३.०० लक्ष |

वर दर्शविल्यानुसार लेखाशीर्ष बदलणे बाबतचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

सूचक : सौ.लता दलाल अनुमोदक : डॉ.आशा बिनवडे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.३६ नागेश्वरवाडी मधील ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामासाठी असणारी रू.३ लक्षची तरतूद याच वॉर्डातील काब्रा उद्यानाच्या संरक्षित भिंतीची उंची वाढविण्याकरीता खालील प्रमाणे लेखाशिर्ष बदलणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

| वॉर्ड क्र. | पृष्ठ क्र./ अ.क्र. | कामाचे नांव व अंदाजपत्रकीय तरतूद | सुधारीत कामाचे नांव व अंदाजपत्रकीय तरतूद |
|---|---|---|---|
| ३६ | १७८/२० | भांडवली कामे जलनि:सारण<br>वॉर्ड क्र.३६ मधील ड्रेनेज लाईन्स बदलून नविन ड्रेनेज लाईन टाकणे-३.०० लक्ष | वॉर्ड क्र.३६ मधील काब्रा उद्यानाच्या संरक्षित भिंतीची उंची वाढविणे ३.०० लक्ष |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१३८/१० :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.४० मधील अर्थसंकल्पातील लेखाशिर्ष व तरतूद बदलणेच्या मंजुरीस्तव.

| वॉर्ड क्र. | पृष्ठ क्र./ अ.क्र. | कामाचे नांव व अंदाजपत्रकीय तरतूद | सुधारीत कामाचे नांव व सुधारीत तरतूद |
|---|---|---|---|
| ४० | १२९/३२ | वॉर्ड क्र.४० गवळीपुरा कब्रस्तान विकसीत करणे-५० हजार | वॉर्ड क्र.४० मध्ये विद्युतीकरण/पथदिवे दुरूस्ती करणे-५० हजार |
| | १३५/२२ | वॉर्ड क्र.४० रेंगटीपुरा मनपा खूली जागा विकसीत करणे- १.०० लक्ष | वॉर्ड क्र.४० निजामोद्दीन कब्रस्तान विकसीत करणे- १.०० लक्ष |

वर दर्शविल्यानुसार लेखाशिर्ष बदलणे बाबतचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

सूचक : श्री.कैसर खान बद्रोद्दीन खान अनुमोदक : श्री.अमोदी अबुबकर

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.४० मधील अर्थसंकल्पातील लेखाशिर्ष व तरतूद खालील प्रमाणे बदलणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

| वॉर्ड क्र. | पृष्ठ क्र./ अ.क्र. | कामाचे नांव व अंदाजपत्रकीय तरतूद | सुधारीत कामाचे नांव व सुधारीत तरतूद |
|---|---|---|---|
| ४० | १२९/३२ | वॉर्ड क्र.४० गवळीपुरा कब्रस्तान विकसीत करणे-५० हजार | वॉर्ड क्र.४० मध्ये विद्युतीकरण/पथदिवे दुरूस्ती करणे-५० हजार |
| | १३५/२२ | वॉर्ड क्र.४० रेंगटीपुरा मनपा खूली जागा विकसीत करणे- १.०० लक्ष | वॉर्ड क्र.४० निजामोद्दीन कब्रस्तान विकसीत करणे- १.०० लक्ष |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १३९/११ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सन २००५-०६ मधील अर्थसंकल्पात पृष्ट क्र.१५६ वर अ.क्र.२१ नुसार इंदिरानगर प्रभाग क्र.५२ मध्ये जलवाहीनीच्या कामासाठी रक्कम रू.९,४३,०००/- ची आर्थिक तरतूद करण्यात आली आहे. या कामासाठी निविदा सूचना देखील काढण्यात आली होती. परंतु सदरील निविदा रद्द करण्यात आली आहे.

सध्या या कामाची आवश्यकता नसल्याने उपरोक्त कामाच्या आर्थिक तरतूदीतुन इंदीरानगर प्रभाग क्र.५२ मधील अंतर्गत गल्ल्यामध्ये ब्लॉक पेव्हींगच्या कामासाठी रक्कम रू.७,००,०००/- तरतूद करावी तसेच उर्वरीत रू.२,४३,०००/- रक्कम इंदिरानगर प्र. क्र.५२ मधील माती उचलण्यासाठी करण्यात यावी. तरी सदरील लेखाशिर्ष बदलून उपकृत करावे.

सूचक : श्री.अमोदी अबुबकर बिनसईद अनुमोदक : श्री.काशिनाथ कोकाटे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सन २००५-०६ मधील अर्थसंकल्पात पृष्ट क्र.१५६ वर अ.क्र.२१ नुसार इंदिरानगर प्रभाग क्र.५२ मध्ये जलवाहीनीच्या कामासाठी रक्कम रू.९,४३,०००/- च्या तरतूदीचे लेखाशिर्ष बदलून त्याऐवजी इंदीरानगर प्रभाग क्र.५२ मधील अंतर्गत गल्ल्यामध्ये ब्लॉक पेव्हींगच्या कामासाठी रक्कम रू.७,००,०००/- व रू.२,४३,०००/- इंदिरानगर प्र.क्र.५२ मधील माती उचलण्याच्या कामासाठी वापरण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १४०/१२ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, सन ०५-०६ मधील अर्थसंकल्पात पृष्ट क्र.१६६ अ.क्र.९३ वरील सिंधी कॉलनी येथे जलवाहीनी टाकणेसाठी असलेल्या तरतूदीचे लेखाशिर्ष बदलून त्याऐवजी लिमयेवाडी मित्रनगर येथे २५ वर्षापूर्वीची असलेली जूनी पाईप लाईन बदलून, नविन पाईप लाईन टाकणे असे करण्यांत यावे. करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सूचक : सौ.हर्षमाला विजयकुमार पाटणी अनुमोदक : श्री.काशिनाथ कोकाटे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सन ०५-०६ मधील अर्थसंकल्पातील पृष्ट क्र.१६६ अ.क्र.९३ वरील सिंधी कॉलनी येथे जलवाहीनी टाकणेसाठी असलेल्या तरतूदीचे लेखाशिर्ष बदलून त्याऐवजी लिमयेवाडी मित्रनगर येथे जूनी पाईप लाईन बदलून, नविन पाईप लाईन टाकणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १४१/१३ :**

शहर अभियंता प्रस्ताव सादर करत आहेत की, औरंगाबाद महानगरपालिकेच्या इ.स.२००५-०६ च्या अर्थसंकल्पात **अ–** औरंगाबाद महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांना सन २००४-२००५ च्या आर्थिक वर्षाचा बोनसपोटी द्यावी लागणारी रक्कम रू.१ कोटी २ लाख, **ब–** महाराष्ट्र राज्य वितरण कंपनीने वाढविलेल्या वीज अधिभाराच्या दरामूळे महापालिकेस रक्कम रू. १ कोटी ८ लाख चे जादा देयक कंपनीस अदा करावे लागणार आहे.

उपरोक्त अ व ब या बाबीसाठी सन २००५-२००६ या वर्षात कोणतीही तरतूद करण्यात आलेली नाही. वरील अ व ब या बाबीचा खर्च भागविण्यासाठी सन २००५-२००६ च्या अर्थसंकल्पात समाविष्ट असलेली यादीतील कामे विविध कारणामूळे (न्यायालयीन स्थगिती, भूसंपादनाची कार्यवाही पूर्ण न झाल्यामूळे, जागेचा वाद इत्यादी कारणामूळे) या आर्थिक वर्षात पूर्ण करणे शक्य होणार नाही. (सोबत रद्द होणाऱ्या कामाची यादी जोडली आहे.)

करिता यादीतील कामामूळे विविध लेखाशिर्षकातील बचत होणारी रक्कम रू.२ कोटी १० लाखाची बचत वरील अ व ब च्या कामासाठी खर्च करण्याबाबतचा प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**टिप :– सोबत यादी जोडली आहे.**

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रस्तुत प्रस्तावातील अ व ब या बाबीसाठी सन २००५–२००६ या वर्षात कोणतीही तरतूद करण्यात आलेली नसल्यामूळे,अ व ब या बाबीचा खर्च भागविण्यासाठी सन २००५–२००६ च्या अर्थसंकल्पात समाविष्ट असलेली सोबत जोडण्यात आलेल्या यादीतील रद्द होणारी कामे विविध लेखाशिर्षकातील बचत होणारी रक्कम रू.२ कोटी १० लाखाच्या बचतीमधून वरील अ व ब च्या कामासाठी खर्च करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

या बरोबर ‘‘राष्ट्रगिताने ‘‘ सभा संपल्याचे मा.महापौर यांनी घोषित केले.

**नगर सचिव**
महानगरपालिका औरंगाबाद.